# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-०७-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २० जुलै २०१५ रोजी (का.प.क्र.५) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १०.३५ वा वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.प्रकाश महाजन,आयएएस, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री. खान जहॉंगीर मुलानी
५. स.स. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री. जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री. वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ. रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री. सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ. स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री. खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्री. जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१७. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१८. स.स. श्री. शेजवळ सुभाष सयाजी
१९. स.स. श्री. रावसाहेब राधाकिसन आमले
२०. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२१. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२२. स.स. श्री. अफसर खॉन यासीन खॉ
२३. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२४. स.स. श्री. सय्यद मतीन रशीद
२५. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२६. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२७. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल

२८. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२९. स.स. श्री. सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
३०. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३१. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३२. स.स. सौ. शोभा नारायणराव वळसे
३३. स.स. श्री. चित्ते नितीन रमन
३४. स.स. सौ. ज्योती सुभाष पिंजरकर
३५. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३६. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३७. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३८. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३९. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
४०. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
४१. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४२. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४३. स.स. श्री. मकरंद माधवराव कुलकर्णी
४४. स.स. श्री. खान इरशाद इब्राहिम
४५. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४६. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४७. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४८. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४९. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
५०. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
५१. स.स. श्री. तनवाणी राजु लेखराज
५२. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
५३. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
५४. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५५. स.स. श्री. एडके विकास प्रकाश
५६. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५७. स.स. श्री. भादवे रामेश्वर बाबुराव
५८. स.स. श्री. बल्लाळ मनोज आसाराम
५९. स.स.श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
६०. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
६१. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
६२. स.स. श्री. शेख जफर अखतर
६३. स.स. श्री. जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६४. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६५. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
६६. स.स. श्री. दांडगे शिवाजी भाऊसाहेब

६७. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६८. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६९. स.स. श्री. खैरे ऋषिकेश चंद्रकांत
७०. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
७१. स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
७२. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
७३. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७४. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७५. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७६. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७७. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७८. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७९. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
८०. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
८१. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
८२. स.स. श्री. जगताप भाऊसाहेब उत्तमराव
८३. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८४. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८५. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८६. स.स. श्री. भगवान (बापु) देविदास घडमोडे
८७. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८८. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८९. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
९०. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
९१. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
९२. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
९३. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
९४. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
९५. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९६. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९७. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९८. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९९. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
१००. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
१०१. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
१०२. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
१०३. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१०४. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०५. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

१०६. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०७. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन

श्री.रेणुकादास वैद्य :माजी खासदार व माजी महापौर श्री.मोरेश्वर सावे यांचे निधन झाले तसेच स्वातंत्र्य सैनिक सिंधुताई भालेराव यांचे हैद्राबाद मुक्ती संग्राममध्ये योगदान होते. त्यांचेही निधन झाले. सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे :श्री.मोरेश्वर सावे हे या सभागृहाचे सदस्य, शहराचे खासदार होते. सामाजिक क्रिडा विषयक, पुर्वीच्या काळामध्ये नियोजना विषयी सभागृहाला शिस्त लावण्या विषयी योगदान आहे. त्यांना तसेच सिंधुताई भालेराव यांना श्रध्दाजंली अर्पण करावी. स्व.मोरेश्वर सावे यांचे नावाने काही करता येईल का याचा विचार करावा.

श्री.नंदकुमार घोडले :जो प्रस्ताव ठेवला त्यास अनुमोदन आहे. उत्कृष्ठ शिस्तप्रिय अशी समाजामध्ये त्यांची ख्याती होती. शहरवासीयासमोर त्यांचे नाव स्मृती कायम राहण्यासाठी एखादया सभागृहास किंवा मुख्य रस्त्यास त्यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.भगवान घडमोडे :समर्थनगर वार्डाचे नगरसेवक होते निरालाबाजार येथील चौकास स्व.मोरेश्वरजी सावे काका असे नाव देण्यात यावे.

श्री.ऋषीकेष खैरे :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :माजी महापौर तसेच माजी खासदार स्व.मोरेश्वर सावे यांचे दु:खद निधन झाले त्यांनी लावलेली शिस्त व त्यांचे कार्याचा गौरव करण्यासाठी.एखादया चौकास नाव देऊन शहरासाठी आठवण ठेवावी त्यासाठी निरालाबाजार येथील चौकास स्व.मोरेश्वर सावे यांचे नाव देण्याचा ठरावास मंजूरी देण्यात येते तसेच हैद्राबाद मुक्ती संग्रामच्या वेळी काम केलेल्या सिधुताई भालेराव तसेच मोरेश्वरजी सावे यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी सर्वांनी उभे रहावे.

श्री.नासरे सिध्दीकी :श्रध्दांजलीत आम्ही सहभागी होऊ इच्छित नाही. आम्ही बाहेर जात आहोत

यावेळी काही स.सदस्य सभागृहा बाहेर जातात.

यावेळी स्व.मोरेश्वर सावे तसेच सिंधुताई भालेराव यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तभ उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर :सर्व नागरीकांना ,स.सदस्यांना रमजान ईद निमित्त शुभेच्छा.

श्री.अफसर खान :समांतर जलवाहिनीच्या संदर्भात इतिवृत्त मागितले दिले नाही.मला मा.न्यायालयीन कामासाठी प्रत पाहिजे एक महिना झाला अदयाप दिली नाही.

मा.महापौर :नगर सचिव यांनी स.सदस्यांना प्रत दयावी.

**विषय क्रमांक २१:-**

शनिवार दिनांक २०.०६.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०३) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.नंदकुमार घोडेले :इतिवृत्त कायम करतांना विषय क्रं.१९ मध्ये पान क्र.२२-२३ वर आस्थापनेवर रिक्त असलेले कार्य.अभियंता पदावर श्री.बनसोडे यांना पदोन्नती देण्याचा ठराव होता तो सम्मत करत असतांना त्यांना दोन वर्ष मुदत वाढ देऊन तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजूरी दिली होती शासनाकडे प्रस्ताव पाठविला परंतु कार्यवाही झाल्याचे दिसत नाही मुदतवाढ देण्यास तांत्रिक अडचण असेल तर त्यांना दोन वर्षासाठी मानधनावर घेण्यात यावे.तसेच ३१ जुलै १५ रोजी श्री.एम.ए पठाण नगरसचिव हे सेवानिवृत्त होत आहे त्याचे काम चांगले असून एक कर्तव्य दक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे त्यांना सुध्दा दोन वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी शासनाकडे पत्रव्यवहार होऊनही कार्यवाही होत नसेल तर त्यांनाही ठराविक वेतन किंवा मानधनावर घेता येईल का ? तशी या ठरावात दुरूस्ती करावी.

श्री.अफसर खान :आताच सुचना केल्यानुसार या दोन्ही अधिकाऱ्यांना कामाचा अनुभव आहे मुदतवाढीचा ठराव मंजूर करतांना शासनाने मान्यता दिली नाही तर यांना मानधनावर किंवा फिक्स पेमेंन्टवर घ्यावे असे त्या बैठकीतच म्हटले होते इतिवृत्तांत आले नाही.आता नमुद करावे व या दोन्ही अधिका-याना मानधनावर नियुक्ती दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य :काहींनी म्हटले की मा.न्यायालयाचा निर्णय मुदतवाढ देता येत नाही. आपण मुदतवाढ देत नाही त्यांना ठराविक वेतनावर घेत आहोत दोन्ही अधिकारी यांना कामाचा अनुभव आहे मनपाकडे मनुष्यबळ कमी आहे विषय समित्याच्या बैठका होणार त्यासाठी उपसचिव हे पद भरण्याचे मागे म्हटले होते.त्यांना नगरसचिव श्री.एम ए पठाण यांचे मार्गदर्शनाखाली २ वर्ष ट्रेनिंग व समित्याच्या बैठकांचे काम दिले तर त्यांना माहिती मिळेल. करीता या दोन्ही अधिका-यांना फिक्स पेमेंन्टवर घेण्यास हरकत नसावी.

श्री.भगवान घडमोडे :श्री.एम ए पठाण व श्री. पी आर बनसोडे यांनी चांगले काम केले. श्री.बनसोडे साहेबांच्या बाबतीत ठराव शासनाकडे पाठविला मंजूरी आली का?

श्री.कैलास गायकवाड :श्री.बनसोडे यांचे बाबतीत प्रस्ताव मंजूर करून पाठविला शासनाकडून मंजूरी आली का ?

उपआयुक्त (म) :श्री.पी आर बनसोडे व श्री.एम ए पठाण, नगर सचिव यांचे बाबतचा ठराव व मा.आयुक्ताचे पत्र शासनाकडे पाठविले होते.शासनाकडून दोन उत्तर आले क्र.१ मध्ये म्हटले की असे करता येणार नाही क्र.२ मध्ये या बाबतीत अहवाल पाठवा.

श्री.भगवान घडमोडे :असे करता येणार नाही कारण काय दिले.अहवाल काय पाठवायचा स्पष्ट सांगावे.मा.न्यायालयाचे या संदर्भात काही आदेश आहे का ?

उपआयुक्त(म) :अहवाल म्हणजे महापालिकेचा त्याबध्दलचा काय अभिप्राय आहे?

श्री.राजेंद्र जंजाळ :मुदतवाढीच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात एक पिटीशन दाखल झाले होते व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने शपथपत्र दाखल करून यापुढे कोणालाही मुदतवाढ देणार नाही असे म्हटलेले आहे हे प्रशासनाला माहित नव्हते का ?असे प्रस्ताव समोर येऊन मान्यता देत असेल तर नगरसेवकांची जबाबदारी प्रशासनाने स्विकारावी.यापुर्वी धोबी घाट संदर्भात प्रस्ताव मंजूर करून घेतला ते सदस्य आज न्यायालयात खेटया मारतात.असे ठराव येतांना कायदेशीर बाबी तपासून यावे. माझ्याकडे जीआर आहे त्याची प्रत प्रशासनाला देतो इतिवृत्तास दुरूस्तीसह मंजूरी दयावी.

श्री.अफसर खान :शासन मुदतवाढ देणार नाही.सभागृहाने विशेष बाब म्हणून ठराविक वेतनावर या दोन्ही अधिका-यांना घेण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :ठराविक वेतनावर घेण्यास आमची हरकत नाही जो ठराव आणला लिगल होता का माहिती घ्यावी.

श्री.घोडेले नंदकुमार :मानधनावर/ठराविक वेतनावर घेण्याचा अधिकार महापालिकेला आहे.दोन्ही अधिका-याच्या सेवेची गरज आहे तसा ठराव दुरूस्त करून पारीत करावा.

श्री.वानखेडे राजगौरव :मानधनावर घेतल्यास त्यांचे अधिकार काय राहतील.

श्री.अब्दुल रहीम नाइकवाडी:कामाचा अनुभव आहे या दोन्ही अधिका-यांना मानधनावर घेण्यात यावे.

विधी सल्लागार :मागे न्यायप्रविष्ठ प्रकरण पीआयएल झालेले होते. मा.उच्च न्यायालयाचे आदेश होते की, मा.न्यायालयाची परवानगी असल्याशिवाय मुदतवाढ किंवा पुर्ननियुक्ती देण्यात येऊ नये. त्यानुसार शासनाने ७ मे २००९ रोजी अध्यादेश काढला सर्व मंत्रालयीन विभागास कळविले आहे.

श्री.भगवान घडमोडे :मा.न्यायालयाने या संदर्भात निर्देश दिले आहे.ठराव ठेवतांना सभागृह व आपण सर्व अडचणीत येऊ नये असे ठराव ठेवू नये.

मा.महापौर :सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर सचिव श्री.एम.ए.पठाण व विद्युत विभाग प्रमुख श्री.पी.आर.बनसोडे या दोघांनाही महापालिकेत पुढील दोन वर्षासाठी ठराविक वेतन/मानधनावर नियुक्ती देण्याच्या दुरूस्तीसह मंजुरी देण्यात येते.

श्री.कैलास गायकवाड :मागिल सभेसाठी मी प्रश्न विचारला होता सभेच्या दिवसापर्यत उत्तर मिळाले नाही त्यानंतर तीन दिवसानी उपआयुक्त म.यांनी उत्तर दिले. माझा प्रश्न क्र.२ चे उत्तरात दिले की सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ७९५ दिनांक २०.६.२०१२ अन्वये श्री.अशोक थोरात मुख्यलेखाधिकारी यांना दिनांक १४.६.२०१२ रोजी रूजू झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीस मान्यता दिली. प्रश्न क्र.३ मध्ये मुदतवाढ देण्यात आली का त्यावर उत्तरात दिले की

नाही,त्यात असे म्हटले की कलम ४५(ब)मधील तरतुदीनुसार शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीच्या मुदतवाढीचे प्रस्ताव मा.सर्वसधारण सभेसमोर सादर करण्याची आवश्यकता नसल्याचे निर्देश तत्कालीन आयुक्त यांनी दिले असे म्हटले .तर तत्कालीन आयुक्त हे कायदयापेक्षा,सभागृहापेक्षा मोठे आहेत का उपआयुक्त म. यांनी चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली.४५(ब)कलम नुसार प्रतिनियुक्तीवर शासनाने पाठविलेले अधिकारी कोणते त्या शासन राजपत्राची प्रत देण्यात यावी.उपआयुक्त म. यांनी नियुक्ती ४५(१)प्रमाणे झाली आहे.त्यामुळे त्यांचे प्रतिनियुक्तीला नियुक्ती प्राधिकारी म्हणून सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बंधनकारक अनिर्वाय आहे.२०-६-२०१२ रोजी एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मान्यता दिली याचा अर्थ हे पद ४५(ब)प्रमाणे येत नाही.४५(ब)चे कलम हे २०-६-२०१२ रोजी प्रस्ताव ठेवतांना अस्तित्वात होते २०-६-२०१२ नंतर मुदतवाढ मान्यता घेणे आवश्यक वाटले नाही का ?याबाबत विधी सल्लागार यांनी मागिल वेळेस चुकीची माहिती दिली की प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.प्रकरण पदोन्नतीच्या बाबतीत कोर्टात आहे.प्रतिनियुक्तीच्या अधिका-यांचा ५३(१)नुसार ठराव ठेवायचा की नाही या बाबतीत मा.न्यायालयात रिट दाखल नाही. सभागृहाचा उपआयुक्त यांनी हक्कभंग केलेला आहे प्रशासनाच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.अफसर खान :अशा अधिका-यांचे प्रस्ताव मुदतवाढीसाठी नियमानुसार यावयास पाहिजे १ वर्ष मुदत वाढ दिली त्यानंतर २ वर्षात प्रस्ताव आले नाही. ज्यांना तीन वर्ष पुर्ण झाले व मुदतवाढीचा प्रस्ताव आला नाही अशा अधिका-यांना परत पाठवावे.

श्री.कैलास गायकवाड :कायदेशीर बाब लक्षात घेता मुदतवाढीचे प्रस्ताव आलेले नसलेल्या अधिका-यांना कार्यमुक्त करावे.

श्री.भगवान घडमोडे :प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिका-याचे प्रस्ताव मंजूरीसाठी यायला पाहिजे. श्री.थोरात यांचा कार्यकाळ पुर्ण झालेला असतांना काम करता त्यांचेकडे आर्थीक बाब संबधीत आहे. भविष्यात काही प्रकरण घडले व त्यांची नियुक्ती लिगल नसेल तर यास कोण जबाबदार, मुदत संपली असेल तर परत पाठवावे.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रतिनियुक्तीवर आलेले किती अधिकारी इतर सर्व अधिका-यांचे प्रस्ताव मंजूरीसाठी आलेले होते का ?

श्री.अफसर खान :श्री.अशोक थोरात यांची मुदत संपली आहे ताबडतोब त्यांना परत पाठवावे.

श्री.नंदकुमार घोडेले :कोणत्या अधिका-यांचे प्रतिनियुक्तीस मान्यता घेण्याची गरज नाही. शासनाकडील अध्यादेश दाखवावे.

मा.महापौर :बैठकीची वेळ ठरलेली आहे काही अधिकारी आता येत आहे सर्व व्हिजीट साईट या दिवशी नको अधिकारी वेळेवर सभागृहात उपस्थित असावे तशा सुचना मा. आयुक्तांनी अधिकारी यांना दयाव्यात या विषया

संदर्भात मा.कोर्टात मॅटर असल्याचे म्हटले होते नेमकी परीस्थिती काय खुलासा करावा.

श्री.जहागीर खान :बैठकीची वेळ ११-३० वाजता ठेवावी.

मा.महापौर :दुपारी दीड दोन वाजेपर्यत बैठक होईल दुपारी ३.०० नतर नागरीकांना अधिकारी भेटतील.त्यामुळे एक तास अगोदर सभा आयोजित होते

श्री.अफसर खान :सकाळी सदस्यांना भेटण्यासाठी नागरीक येत असतात. ११.३०वाजता सभा असावी

श्रीमती किर्ती शिंदे :नागरीक समस्या घेवून सकाळी येत असतात वार्डात आम्हाला फिरावे लागते ११.३० वाजेची सभेची वेळ करावी.

मा.महापौर :आपल्या सुचनाचा विचार करण्यात येईल.

विधी सल्लागार :या संबधी मागिल वेळेस मा.उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचा उल्लेख केला होता.मा.न्यायालयाचा सन्मान राखून या प्रकरणात श्री.संजय पवार यांनी महाराष्ट्र शासन, महापालिका व श्री.थोरात यांचे विरूध्द एक रिट याचिका दाखल केली याचिकेत श्री. थोरात याचे प्रतिनियुक्ती व नियुक्ती संबधी व त्यांचे इतर बाबी संबधी आणि श्री.पवार यांचे पदोन्नती व इतर बाबी संबधी उल्लेख आहे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि प्रकरण २ मध्ये नियम क्र. ५(१)(ब) (दोन) मध्ये दिले की भारताच्या कुठल्याही न्यायालयामध्ये कुठल्याही प्रदेशामध्ये एक प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल त्या संदर्भात प्रश्न विचारता येत नाही.प्रकरण न्यायप्रविष्ट आहे ३० तारखेला ठेवलेले आहे.

श्री.कैलास गायकवाड :मा.कोर्टात प्रमोशन बाबत प्रकरण आहे. ५३(१)नुसार मुदतवाढ देण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेचे आहे. न्यायालयातील प्रकरण व मुदतवाढीच्या संदर्भातील विषय याचा संबध येत नाही

विधी सल्लागार :अधिनियमातच उल्लेख आहे ते सादर केले.मा.न्यायालयात प्रकरण आहे त्यात श्री.थोरात यांची प्रतिनियुक्ती नियुक्ती व डेप्युटेशन बाबत मान्यता वगैरे घेतली आहे का या सर्व बाबीचा उल्लेख आहे.

श्री.भगवान घडमोडे :श्री.थोरात यांचा मुदवाढीचा ठराव येण्याची गरज आहे की नाही नसेल तर शासनाकडून कोण अधिकारी येतील किती कालावधी असेल कोणत्या संवर्गातील अधिका-यांना त्याचे बंधन आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रकरण न्यायालयात असेल तर चर्चा करता येत नाही असे म्हटले समांतर जलवाहिनी संदर्भात मा.उच्च न्यायालयात ४ पिटीशन दाखल आहे त्यावर चर्चा करतो हे कितपत योग्य आहे खुलासा घ्यावा.

श्री कैलास गायकवाड :५३(१) अन्वये अधिका-यांची मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता घेण्याची गरज आहे की नाही

श्री.नंदकुमार घोडेले :समांतर जलवाहिनी संदर्भात ४-४ पिटीशन दाखल आहे त्या संदर्भात मागील बैठकीत चर्चा केली ती वैध आहे का ?

श्री.अफसर खान :प्रकरण न्यायालयात कोणत्या स्टेजवर आहे मा.न्यायालयाचे त्या संबधी काय डायरेक्शन, अमुक प्रकरणाला स्थगिती दिली चर्चा करू नये असे

| | |
|---|---|
| | डायरेक्शन असेल तर चर्चा करणार नाही तसे लेखी दाखवावे. आम्ही न्यायालयाचा आदर करतो. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :समांतर बाबत ४-४ पिटीशन मा.न्यायालयात दाखल आहे मागिल बैठकी पाईपच्या संदर्भात १५३ कोटीचा प्रस्ताव होता तो ठेवता येतो का? |
| श्री.भगवान घडमोडे | :मा.कोर्टाचा आम्ही अवमान करीत नाही.जर प्रत्येक विषयाच्या बाबतीत एखादा व्यक्ती कोर्टात प्रकरण घेऊन गेला तर सभेचे कामकाज करायचे नाही का?मा.न्यायालय लोकशाहीचा गळा घोटवा म्हणतात का?घटनेने जे अधिकार दिले ते वापरायचे नाही का? |
| श्री.नंदकुमार घोडेले | :समांतर बाबत मागिल बैठकीत चर्चा केली ती वैध आहे का ? |
| श्रीमती समीना शेख | :समांतर लाईनच्या करारनाम्याची मराठी भाषेतून प्रत देण्याची मागिल सभेत मागणी केली अदयाप प्रत दिली नाही. |
| शहर अभियंता | :सदस्यांना प्रत दिली जाईल. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :सभागृहातील ठराव बाबत अंमलबावणी होते का मागिल बैठकीत श्री.संजय पवार लेखाधिकारी यांचे बाबतीत ठराव घेतला काय कार्यवाही केली.समांतर जलवाहिनी संदर्भात कराराची प्रत सदस्यांना का दिली नाही. |
| श्री.कैलास गायकवाड | :प्रतिनियुक्तीचे अधिकारी किती,कितींना मुदतवाढ दिली नाही पुढील बैठकीत माहिती घ्यावी. |
| मा.महापौर | :प्रतिनियुक्तीच्या अधिका-यांची मुदतवाढ घ्यायला पाहिजे जे जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आहे त्यांचे ठराव पुढील बैठकीत आणावे. |
| श्री.भगवान घडमोडे | :मुदतवाढ न देता अधिकारी आर्थीक बाबीशी संबधीत काम पाहत आहे त्यास जबाबदार कोण असणार,मुदतवाढ का घेतली नाही ताकीद दयावी असे होत असेलतर सभागृहाला महत्व राहणार नाही. |
| मा.महापौर | :अधिकारी कर्मचारी निवृत्त होत आहे. जे निवृत्त होतात त्यांना महापालिकेत नियुक्ती देण्याचे बोलतो दुसरीकडे जे अधिकारी आहे त्यांना परत पाठवले तर प्रशासनातील काम होणार का असा प्रश्न पडतो.दोन्ही बाजूचा विचार करावा लागेल. |
| श्री.भगवान घडमोडे | :मुख्यलेखाधिकारी जागेवर भेटत नाही फोन बंद असतो.ते काम करण्यास इच्छुक नसतील तर परत पाठवावे. |
| मा.महापौर | :प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी यांचा मुदतवाढीचे ठराव आणवेत. इतिवृत्त दुरूस्ती सह कायम करण्यास मंजूर करण्यात येते. |

**ठराव :-**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सर्वसाधारण सभा दिनांक २०.०७.२०१५ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक-१९ मध्ये

१. श्री.एम.ए.पठाण नगर सचिव यांना पुढील दोन वर्षासाठी महानगरपालिकेत ठराविक वेतन/मानधानावर नियुक्ती करण्यास व

२. श्री.पी.आर.बनसोडे तत्कालीन विद्युत विभाग प्रमुख यांनाही पुढील दोन वर्षासाठी महापालिकेत ठराविक वेतन/मानधनावर नियुक्ती करणे ईत्यादी दुरूस्तीसह दिनांक २०.०६.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

प्रश्न क्रमांक-२२,२३,२४,२५,२६ स.श्री.जहागीर खान अब्बास खान मुलानी

श्री.जहांगीर खान :श्री.शिवाजी झनझन यांनी ३-१-१९७० चे जन्माचे खोटे प्रमाणपत्र दाखल केल्याबध्दल १० तारखेला तक्रार दिली होती त्यावर काय कार्यवाही केली.

उपआयुक्त (म) :दिनांक २-७-१५ रोजी पत्र मिळाले आहे.प्रश्न २०-७-२०१५ च्या बाबतीत आहे ते मिळाले नव्हते ते प्राप्त करून घेतले या संदर्भात चौकशी करून मा.आयुक्ताकडे अहवाल दिला जाईल.यात त्यांचे गावाकडे जाऊन माहिती घ्यावी लागेल.

श्री.जहांगीर खान :या संदर्भात कोर्ट प्रकरण झाले ९ महिणे झाले प्रशासनाने चौकशी का केली नाही.माहिती मिळत नाही नागरीकांना उत्तर दयावे लागते.माहिती देत नसतील त्यांना परत पाठवावे किंवा कार्यवाही करावी.

उपआयुक्त (म) :माहिती घेवून उत्तर देता येईल १ महिण्याचा कालावधी लागेल.

श्रीमती संगिता वाघुले :प्रत्येक अधिकारी यांनी त्यांचे पध्दतीने वेळेवर कामे केली तर चर्चा करण्याची वेळ येणार नाही

श्री.गजानन बारवाल :हे प्रकरण मा.कोर्टात ९ महिण्यापासून चालू आहे.अधिकारी उत्तर देत नाही विधी सल्लागार यांचेकडून माहिती घ्यावी.

विधी सल्लागार :श्री.शिवाजी झनझन यांनी जन्म तारखे संबधानेच मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली व योग्य निर्देश देण्याची विनंती केली त्यानुसार सदर याचिका सुनावणी अंती निकाली काढली व प्रशासनाला या बाबतीत तपासणी कार्यवाही करावी प्रशासनाला आदेशीत केले.

श्री.गजानन बारवाल :मा.न्यायालयाने केंव्हा सांगितले आहे.

मा.महापौर :वेळ दयावा लागेल पुढील बैठकी पर्यत माहिती दयावी.

प्रश्न क्रमांक -२३:

श्री.जहागीर खान :दिं.३-२-२०१५ च्या सभेत ठराव क्र.७३०,७३१ नुसार वार्ड क्र.२८ मध्ये नेहरूनगर कटकटगेट लगतच्या व टाईम्स कॉलनी येथील नाल्यावर अतिक्रमण करून नाल्याची रूंदी कमी केली त्या बाबत काय कार्यवाही केली.

मा.महापौर :प्रशासकीय अधिकारी संदर्भात प्रश्न आहे खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी :टाईम्स कॉलनीमध्ये ले-आऊट मंजूर आहे ले-आऊट पडलेला आहे. त्यांचे म्हणणे की नाला बुजून केले. ले-आऊट नुसार इमारतीचे बांधकाम आहे प्रशासनाने त्यांना नोटीस दिली आहे.

श्री.जहांगीर खान :मंजूरी देण्यात एक वर्ष झाले.त्यापुर्वी या जागेचे मनपाने मोजणी करून सिटी सर्व्हे ऑफीसला २० लक्ष भरणा केले. तेथील पाहणी केल्यास मोठा नाला होता आता नाली झाली. लाखोचे प्लॉट तयार केले.

श्री.फिरोज खान :अनेक ठिकाणी मोठे नाले होते आता नाली झाली.सर्रास अतिक्रमणे होऊन प्लॉट होत आहे.अधिकारी याचे लक्ष नाही.

मा.महापौर :सध्या अधिकारी उपस्थित नाही १० मिनिटात खुलासा घेता येईल.

श्री.जहांगीर खान :सभेच्या दिवशी अधिकारी सुट्टी देत असतील तर बरोबर नाही आठ दिवसापुर्वी प्रश्न दिला उत्तर दिले नाही.

श्री.गजानन बारवाल :अधिकारी सभेत नसतील तर प्रशासनाने माहिती घेतली असेल आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रश्न दिला असेल तर माहिती दयायला पाहिजे पुढील बैठकीपर्यत त्यांना माहिती दयावी

श्रीमती संगिता वाघुले :मिसारवाडी परीसर स्लम घोषीत नाही येथे कोटयावधीचे काम केले ते आता खराब झाले १० वर्षापासून कुणीही अधिकारी येथे आले नाही.

श्री.जहागीर खान :अधिकारी सभेला नसतील तर सभा तहकूब करावी.

यावेळी डायस समोर स.सदस्य एकत्रित जमा होतात व डायस समोर बसतात.

श्री.गजानन बारवाल :प्रशासनाच्या वतीने आयुक्तांनी उत्त्तर दयावे.उत्तर देत नसतील तर हा सभागृहाचा अवमान आहे.

मा.आयुक्त :या ठिकाणी मी स्वत: स.श्री.जहागीर खान यांचे बरोबर कटकटगेट भागाला भेट दिली जेथे अतिक्रमण झाले. तेथील काम बीओटीवर कसे करता येईल चर्चा झाली. जे अधिकारी उपस्थित नाही त्यांना कडक समज दिली जाईल पुढील बैठकीत या संबधी माहिती दिली जाईल.

प्रश्न क्रमांक २५ :

श्री.जहांगीर खान :वार्ड क्र.२७ मध्ये बाबर कॉलनी भागात विद्युत डीपी ते ताहा मस्जीद पर्यंत एक फुट रस्ता खोदुन २०० ते २५० फुटाची डीआय ऐवजी एसी सिमेंटची पाईप टाकले कंपनीचे अधिकारी यांना बोलवले चुक मान्य केली. नळाचे कनेक्शन तोडले आता पाण्यासाठी जनतेची भाडणे होतात काम करतांना कोण कोणाची दिशाभूल करीत होते? माहिती दयावी.

श्री.जमीर कादरी :मनपाचे हॉल, दुकाने किती अनेकांनी कब्जा केला औरंगपूरा येथील मनपाच्या प्रिया मार्केट मध्ये बिअर शॉपी ओपन झाली दिल्ली गेट येथील मनपाच्या निवासस्थान श्री पत्की यांना दिले होते.ते निवृत्त झाले तेथे अज्ञ ाात व्यक्तीनी कब्जा केला प्रशासनाचे लक्ष नाही. गुन्हा दाखल करावा.

मा.महापौर :या संबधी दोन दिवसानंतर बैठक आयोजित केली जाईल.

प्रश्न क्र.२७-२८-२९-३० स.श्री.नंदकुमार घोडेले

श्री.नंदकुमार घोडेले :शहरात वर्गवारी नुसार किती मालमत्ता,त्यांना किती कर लागलेला आहे परंतु ढोबळ पणे निवासी, व्यावसायिक व एकूण मालमत्ता असे उत्तर दिले माझे समाधान झाले नाही. माहिती दयावी.

कर निधारक व संकलक:प्रत्येक मालमत्तेचे वर्गवारीनुसार कर लागलेला आहे माहिती मागितली आहे.मोबाईल टावर्स व शाळा एवढयाच मालमत्ता सध्या क्लासीफाईड झाल्या. हॉस्पीटल, पंप, शॉप किंवा गोडाऊन असेल याचे क्लासीफिकेशन चालू आहे जास्तीत जास्त एक महिना लागेल.

श्री.नंदकुमार घाडेले :अनेक वर्षापासून मालमत्ता या आधी सर्वे का झाला नाही. अनेकदा उत्पन्न वाढीसाठी चर्चा झाली. सकारात्मक भुमिका प्रशासन घेत नाही. अनेक मालमत्ता रेकॉर्डवर नाही. त्या बाबतीत काय करणार आहे.

कर निर्धा.व संकलक :मा.महापौर व पदाधिकारी यांचे समवेत बैठक झाली अनेक मुद्दे समोर आले ब-याच मालमत्तेला टॅक्स वाढविले. एका शाळेला ११ हजार टॅक्स होता तो आता २.९९ लक्ष केला.अशा मालमत्ता समोर येत आहे त्याप्रमाणे दुरूस्त करीत आहोत.

श्री.राजगौरव वानखेडे :शैक्षणिक संस्थेला कर कोणता लावण्यात येतो.काही संस्था मा.कोर्टात गेलेले होते.

कर निर्धा.व संकलक :ज्या अनुदानित संस्था त्यांना निवासी ज्या अनुदानित नाही त्यांना कमी कमर्शिलय व इंजिनिअरींग व मेडीकल कॉलेजला कमर्शियल कर लावतो.काही संस्था कोर्टात यासाठी गेल्या की अनुदानित संस्थांना निवासी कर लावावा बैठकीत तसा ठराव घेतला व कर लावतो.

श्री.रेणुकादास वैद्य :नाथ सुपर मार्केट दुकानांना ९-१० लक्षच्या नोटीसा दिल्या त्या लोकांनी ४-४ लक्ष मागिल वर्षी भरले आता प्रकरण न्याय प्रविष्ठ असतांना नोटीसा दिल्या पाच वर्षा पासून हा विषय प्रलंबीत आहे त्या लोकांशी चर्चा करायला पाहिजे हे कुणी बघत नाही वर्षाला २५ लक्ष मिळू शकतात नुसत्या नोटीसा देणे ही पध्दत बरोबर नाही.४ लक्ष भरले कुठेही नोंद नाही प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे ९५ टक्के भाडेच्या दराने कर लावलेला त्यांचे म्हणणे असे की स्क्वेअर फुट प्रमाणे आकारणी करावी त्या प्रमाणे कर भरणा करून घ्यावा.

कर निर्धा.व संकलक :या व्यापारी संकुलास १९९० पासून कर लागलेला नव्हता गेल्या वर्षापासून लावला

श्री.रेणुकादास वैद्य :दिशाभुल करतात. मोठे आकडेवारी दाखवतात. कर भरणा बाबत धनादेश घेतात ते बॉन्स होतात. या प्रकरणात मा.आयुक्तांनी त्या लोकांना बोलवून त्यांचेशी चर्चा करून योग्य मार्ग काढून त्यांचेकडून कर भरणा करून घेतला पाहिजे. लोक कोर्टात जातात ते आपले वकील मॅनेज होतात मनपाचे नुकसान होते.

श्री.अफसर खान :जो टॅक्स आहे तो वसुल केलाच पाहिजे सुट देऊ नये वाटल्यास समान हप्ते करावे कोर्टात गेले असेल तर मनपाचे वकील लावून कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शै.संस्थांना कमर्शिलय टॅक्स लावत होतो तो आता निवासी प्रमाणे वसुली करणार काय?.

कर निर्धारक व संकलक:सन २०११-१२ पासून अनुदानित संस्थेला निवासी कर विना अनुदानित संस्थेला कमी कमर्शिलय व इजिंनिअरींग व मेंडीकल कॉलेजला कमर्शिलय टॅक्स लावतो.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली त्यानुसार निवासी कर लावत आहोत जो पुर्वी होता तो कायम आहेत.

श्री.राजेंद्र जंजाळ :सभेच्या जादा कामकाज नियमावलीमध्ये क्रमांक १०२ मध्ये काय तरतूद आहे.

श्री.सुभाष शेजवळ :शाळा हे कमर्शियल येते कमर्शियल कर लावायला पाहिजे.

श्री.नंदकुमार घोडेले :मालमत्ताचे रिव्हीजन करावे एक ऐवजी दोन मजले झाले. पार्कीगच्या व इतरत्र जागेवर बांधकाम केले,क्षेत्र वाढले.निवासी ठिकाणी कमर्शियल वापर होतो.त्याप्रमाणे कर लावणे आवश्यक आहे.इतरही तृटया कर न वाढण्या मध्ये आहे.एलबीटी १ तारखेपासून बंद होणार ते सर्व कर्मचारी मालमत्ता कराचे वसुलीसाठी देण्यात यावे. पुर्ण शहरातील ज्या मालमत्ताची नोंद नाही त्याचा सर्वे करावा.

मा.महापौर :उत्पन्न वाढले पाहिजे. मालमत्ता कर व इतर कराच्या माध्यमातून येणारे उत्पन्न या संदर्भात विशेष बैठक घेवून कार्यवाही केली जाईल.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :शैक्षणिक संस्थांना कमर्शिलय कर लावता अशी तरतूद आहे का ?
कर निर्धारक व संकलक सर्वसाधारण सभेने मान्यता दिली त्यानुसार कर आकारणी होते.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रश्न २९ नुसार एकूण मोबाईल टावर्स किती,अधिकृत किती ज्या इमारतीवर उभे आहे ती इमारत आरक्षीत की, कमर्शियल किंवा निवासी जागेवर आहेत का तपशिल विचारला होता माहिती दिली नाही.

मा.महापौर :एकाच टावर्सवर अनेक कपंन्याचे कनेक्शन .किती टावर्स आहे अधिकृत किती अनधिकृत किती.खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी :४७ टावर्स अधिकृत व ३२५ टावर्स अनधिकृत आहे घरांना शास्ती लावतो तसेच ३२५ मोबाईल टावर्सला शास्ती (दंड)दुप्पट कर केला आणि गेल्या वर्षी तो वसुल पण केला.

श्री.नंदकुमार घोडेले :कर दुप्पट केला असेल परंतु इलिगल टावर्स होत असतांना ते थांबविले का नाही

प्रशासकीय अधि. :एका दिवसात नव्हे तर १५-२० वर्षात उभे राहिलेले आहे.

श्री.अफसर खान :१०००टावर्स इलिगल असतील.एकाचे पैसे भरतात ५-५ टावर्स उभे करतात.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :जेथे टावर्स उभे केले ते आरक्षीत की निवासी की कमर्शियल जागेवर आहे ती इमारत योग्य चौकशी लावावी. अहवाल पुढील बैठकीत ठेवण्याचे आदेश करावे.ज्या इमारतीवर उभे केले त्या इमारतीला स्टॅबीलिटी प्रमाणपत्र आहे का इंजिनिअरचे स्टॅबीलिटी प्रमाणपत्र आहे. जर इमारत कोसळली त्यास कोण जबाबदार असणार आहे. टावर्सच्या संदर्भात प्रकरण निहाय चौकशी लावून अहवाल पुढील बैठकीत घ्यावा.

श्री.जहांगीर खान :हर्सुल जेलच्या बाजूला मनपाने लेआउटला व तेथील प्लॉटधारकांना बांधकामास मंजूरी दिली आता घरे तोडण्यास जात आहे सर्व माहिती दयावी.

मा.महापौर :विषयपत्रिकेवर हा विषय नाही.

श्री.अफसर खान :गरीबांची घरे तोडत आहे. तेथे त्यांना बांधकामास परवानगी दिली चुकीने परवानगी दिली का ?

श्री.राजू शिंदे :आताच म्हटले ३०० टावर्स इलिगल पिठाची गिरणीस परवानगीसाठी एनओसी घेतो. परंतु मोठया प्रमाणात टावर्स उभे होतात परवानगी घेत

नाही. मा.पोलीस आयुक्त यांनी सुध्दा लहान मोठया हॉटेल,बिअर शॉपस् परवाना असल्याशिवाय चालू नये असे सक्त सुचना केल्या असे दुकाने,हॉटेल २-३ महिण्यासाठी सील केले.त्याप्रमाणेच मनपाने सुध्दा टावर्स होत असतांना त्यांना एनओसी असल्याशिवाय परवानगी देऊ नये ते टावर्स सिल करावे शक्यतो निवासी भागात टावर्स असू नये. कमर्शियल भागात परवानगी देण्यासाठी एक महिण्याचा वेळ दयावा अधिकृत करावे हे करीत असतांना त्या इमारतीची टावर्स तोलण्याची क्षमता आहे की नाही एका टावर्सवर किती कंपन्या उपयोगात आणत आहे ते रेकॉर्डवर यावे टावर्स असलेल्या इमारतीचा मालमत्ता कर कंपनी या मालक कोण भरणा करतात हे सर्व तपासावे. इलिगल असेल व दुर्घटना घडली तर मनपा त्यास जबाबदार असणार आहे.

श्री.सिताराम सुरे :सुरेवाडी भागात अनधिकृत टावर्सचे तीन दिवसापासून काम चालू आहे.नागरीक निवेदन घेवून माझेकडे आले त्यानुसार मी प्रशासकीय विभागास पत्र दिले. अधिकारी यांना फोनवरून बोललो कुणी ही कर्मचारी तेथे आले नाही. नागरीकांना त्रास होईल अनधिकृत टावर्स होऊ नये काम थांबवावे. नागरीकांचा विरोध आहे.

श्री.कैलास गायकवाड :३०० मोबाईल टावर्स अनधिकृत आहे अनेक कंपन्या मा.न्यायालयात गेलेल्या आहे.प्रकरणे न्यायप्रविष्ठ किती त्यामध्ये मनपाच्या वतीने सी ए काय दाखल केले. मनपाने काय भुमिका मांडली.

श्री.अफसर खान :टावर्स कुठे असावे कूठे असू नये या बाबतही माहिती दयावी.शाळेच्या बाजूला टावर्स उभे होतात यामूळे मनुष्यहाणी होऊ शकते.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रश्न क्र.३०,३१ चे उत्तर मिळाले नाही.नगररचनाचे अधिकारी उपस्थित नाही पुढील सभेत उत्तर दयावे.

मा.महापौर :पुढील सभे पर्यंत या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री.जहागीर खान :प्रश्न क्र.२३ नुसार नेहरूनगर येथील नाल्यावर होत असलेले अतिक्रमणा बाबत १० मिनिटात खुलासा देणार होते.तो दयावा.

नगर रचनाकार-१ :या ठिकाणची माहिती घेतली असता लेआऊटचे प्लॉट नाल्यापर्यंत आलेले आहे.

मा.आयुक्त :या विभागाचे अधिकारी उपस्थित नाही.मी स्वतः माहिती घेतो आठ दिवसात माहिती दिली जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :सभेतील प्रश्न व विषय पत्रिका प्रशासन व संबधीत अधिकारी यांना किती दिवस अगोदर मिळते.

नगर सचिव :विषय पत्रिका निघाल्यानंतर त्या तारखेस व लगेच दुस-या दिवशी वर्तमानपत्राद्वारे जाहीर प्रसिध्दी दिली जाते व कार्यालयास व सदस्यांना लगेच वितरीत करण्यात येते. वितरणास जो वेळ लागतो तेवढाच वेळ होतो.

श्रीमती माधुरी देशमुख :विषयपत्रिकेची माहिती किती दिवस अगोदर अधिका-यांना होते.

नगर सचिव :सात दिवस पुर्ण अगोदर विषयपत्रिका काढली जाते त्यानंतर लगेच वितरणाची कार्यवाही होते. वर्तमान पत्रातही जाहीरात लगेच दुस-या दिवशी प्रसिध्दीस दिली जाते.

श्रीमती माधुरी देशमुख :सदस्य पोटतिडकीने प्रश्न मांडतात उत्तर तसे मिळत नाही. या पुढील सभेत सर्व माहितीसह अधिकारी यांनी यावे.

श्री.गजानन बारवाल :अधिकारी नसेल उत्तर देऊ शकत नसतील तर मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.उपमहापौर :सदस्य प्रश्न विचारतात मा.आयुक्तांनी गाभीर्याने घ्यावे.पुढील बैठकीत सर्व माहिती दिली पाहिजे.

मा.महापौर :सदस्यांच्या प्रश्नाला खुलासा मिळत नसेल तर निर्णयही होणे अपेक्षीत नाही.येणा-या सभेत सर्व प्रश्नाचा,खुलासा झाला पाहिजे.

श्री.नितीन चित्ते :सभेच्या अगोदर मा.आयुक्तांनी अधिका-यांची बैठक घ्यायला पाहिजे सभागृहात उत्तर देतांना योग्य प्रकारे दिले पाहिजे या बैठकीत एक तर दुस-या बैठकीत वेगळे उत्तर दिले जाते हे बरोबर नाही.या शहराचे आपण प्रथम नागरीक आहात.

या वेळी डायस समोर अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :२० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(वेळ १.५५ वा.पुन्हा २.३५ सभा सुरू)

प्रश्न क्रमांक ३५,३६,३७,३८,३९ स.सदस्य श्री.रामेश्वर भादवे

श्री.रामेश्वर भादवे :प्रश्न क्र.३५ नुसार जाफरगेट अभिनय टॉकीज शेजारी स्टील मार्केटचा ले-आऊट मनपाने कधी मंजूर केला तो व्यवसायिक की घरगुती उद्देशासाठी देण्यात आला ले आऊट मध्ये मनपाची खुली जागा नियमानुसार सोडण्यात आली आहे का असल्यास ती जागा किती व कोणत्या ठिकाणी याची माहिती दयावी.तेथील नागरीकांची उद्यानासाठी मागणी होत आहे. मला उत्तर दिले नाही.

श्री.कैलास गायकवाड :उत्तर मिळत नाही गंभीर बाब आहे.

मा.महापौर :स.सदस्यांना वेळेवर उत्तर दिले पाहिजे. उत्तर दिल्यानंतर समाधान झाल्यास सभेचा वेळ वाया जाणार नाही.

उपअभियंता(न.र) :स.सदस्यांना १७-७-१५ रोजी उत्त्तर दिले आहे मिळाले नसेल तर लगेच प्रत दिली जाईल.

श्री.रामेश्वर भादवे :तेथे उद्यान करून दयावे नागरीकांची मागणी आहे जागा मिळत नाही.प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून दाखवावे.

मा.महापौर :प्रत्यक्ष जागेवर जाऊन स.सदस्यांना जागा दाखववावी.

श्रीमती संगिता वाघुळे :मिसारवाडी हा अनेक सुविधा पासून वंचित आहे या भागात आपण पाहणी करावी.

मा.महापौर :सदर ठिकाणी पाहणी करण्यात येईल.

श्री रामेश्वर भादवे :प्रश्न ३७ चे गोलमोल उत्तर मला देण्यात आले.२००५-०६ मध्ये अधिकारी कोण होते. त्यांचा अहवाल काय आला.

उपआयुक्त (मा.म.) :स.सदस्यांनी विचारलेला जाफरगेट आठवडी बाजार संदर्भातील प्रश्नाचा खुलासा १७-७-१५ ला दिलेले आहे २००५-०६ मध्ये दर्शनदास जैस्वाल यांना जाफर गेट आठवडी बाजार १५ हजार प्रमाणे दिलेला होता २५-११-०५ ते ३१ मार्च पर्यंतची थकीत रक्कम दिली.सन ०६-०७ मध्ये श्री.चव्हाण यांना ठेका दिला त्यांनी केस केली केस क्र.१२४/२०१२ पुढे कचरू गोकुळ आहेर गवळी यांचेकडे थकीत रक्कम २.६१ लक्ष आहे.

श्री.रामेश्वर भादवे :२००८-०९ ची थकीत रक्कम का दाखवली नाही.

उपआयुक्त (मा.म.) :२०१२ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.रामेश्वर भादवे :यात तोच व्यक्ती टेडर घेतो नाव बदलते दरवर्षी १२-१५ लक्ष पुंजी जमा करतो यात मोठे आर्थीक भ्रष्टाचार व अधिकारी मिळालेले आहे.२००५ पासून मनपास पैसे मिळत नाही.किरण काजी नावाचा व्यक्ती १२-१३ मध्ये ८ लक्षचे टेंडर घेतले पैसे भरले नाही तरी १३-१४ चे टेंडर कसे दिले गेले.रविवारी बाजार झाल्यानंतर सोमवारी पैसे घ्यायला पाहिजे एक एक वर्ष पैसे वसुल करीत नाही.

उपआयुक्त (मा.म.) :आपली मागणी रास्त आहे ज्यांचेकडे थकबाकी आहे त्यांचे मालमत्तावर टाप आणून पैसे वसुल करू तसे पत्र सर्व वार्ड अधिकारी यांना दिले बाजारामध्ये लोकांनी पैसे भरले नाही.मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष बोलवून जो टेंडर भरतो त्यांची मालमत्ता कागदपत्र घ्यावे दर भरल्यानंतर प्रत्येक आठवडयात त्यांचेकडून पैसे घ्यावे.

श्री.भगवान घडमोडे :वसुली कोणत्या अधिका-याच्या काळात थकलेली आहे.

मा.महापौर :आठवडी बाजार, लेआऊट,मार्केटचा विषय असेल अधिकारी म्हणून चौकशी करावी.पैसा वसुल करावा कोण दोषी आहे पुढील बैठकीत अहवाल दयावा.

श्री.रामेश्वर भादवे :मनपाकडे बाजार आला तेंव्हापासून किती वसुली झाली.

उपआयुक्त (मा.म.) :७-८ हजार येत होते. कालच्या बाजारात ५ हजार वाढले पुढील बाजारात आणखी वाढेल.

मा.महापौर :मनपाच्या जागा हॉल दुकानेअसतील तेथे लोकांनी अतिक्रमण केले संस्थेला जागा दिल्या ते पैसे भरत नाही. सिडकोच्या जागा हस्तांतर करून घेतल्या त्या शाळेला भाड्याने दिल्या. ते भाडे येते का हे सर्व बघीतले जावे. सातारा देवळाई येथील जागा आहे त्या आपल्या ताब्यात घ्याव्यात या सर्व मालमत्ता कलेक्ट कराव्या व उत्पन्न वाढेल यासाठी प्रयत्न करावे.

प्रश्न क्र.३९ :

श्री.रामेश्वर भादवे :सन २००५ पासून किती ले-आऊट मंजूर केले.ब-याच कंपन्या येणार आहे प्रदुषण वाढणार आहे. अशा ठिकाणी ओपनस्पेस सोडली का ?

श्री.सुभाष शेजवळ :पडेगांव भागात जयसींगपूरा सर्वे नं ५-१-२ असा असून तेथे ओपनस्पेसची जागा कुठे आहे. नियमानुसार भाजी मंडई भरविता येईल व विक्रेत्याकडून मनपास पैसे वसुल करता येईल.

श्री.रूपचंद वाघमारे :वार्ड ३ मध्ये सवेरा पार्क मध्ये ले-आऊट मंजूर व बांधकाम परवानगी दिल्यानंतर तेथील घरे पोलीस सरंक्षणात तोडली जात आहे. हे योग्य नाही. इतर ठिकाणी अतिक्रमण होते फोन केला तरी येत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :विजयनगर भागात ८ लोकांची कारण नसतांना घरे पाडली उद्यान करायचे पर्यांयी जागा देऊ आश्वासन दिले अदयाप जागा दिली नाही.

प्रशासकीय अधिकारी :जेल पासून या इमारतीतील १८२ मीटरच्या आत आहे. या संदर्भात मा.पोलीस आयुक्त, मनपा आयुक्त, मा.जिल्हाधिकारी तसेच जेलचे अधिक्षक यांची संयुक्त व्हिजीट झाली.त्या इमारतीवरून अपघात किंवा अतिरेकी हल्ला होऊ शकतो १८२ मी च्या आत इमारत असू नये.टी पी चा अहवाल आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :ले-आऊट मंजूरी व बांधकामस ही मंजूरी दिली असेल तर ही जबाबदारी कुणाची? आणि पावसाळयात अतिक्रमण काढता येते का?

श्री.रूपचंद वाघमारे :तेथे अनुचीत प्रकार घडला तर मनपा जबाबदार राहिल.डीपी रोडपासून ५०० मीटर तोडणार म्हणून सांगितले.नोटीस दिली नाही.

उपअभियंता (न.र) :येथील लेआऊटला मंजूरी दिली बांधकामसही मंजूरी दिली परंतु जेल प्रशासनाने जेलपासून १८२ मी पर्यत बांधकाम परवानगी रद्द करावे सुचना होत्या त्यानुसार कार्यवाही करीत आहोत.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :परवानगी देतांना नगररचनाने १८२ मी. च्या बांधकाम होऊ नये असे दिले नव्हते का?

प्रशासकीय अधिकारी :नोटीस दिल्या शिवाय अतिक्रमण विभाग काम करीत नाही.

श्री.राजू शिंदे :जेल प्रशासनाची परवानगी का घेतली नाही जे लिगल आहे ते तोडतो बरोबर नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :जेल प्रशासनाच्या सांगण्यानुसार कार्यवाही होत असेल तर मनपास सुध्दा अधिकार आहे त्यानुसार काम करावे या प्रकरणाची चौकशी व्हावी.

श्री.राजू शिंदे :ज्यांची कर्ज काढून घरे बांधली नुकसान होत आहे त्यांचे काय ?

श्री.रेणुकादास वैद्य :चौकशी करुन पुढच्या सभेत सादर करावे.

श्री.चेतन कांबळे :१९९३ पासून भावसिंगपूरा पडेगाव १५० रोडवर अतिक्रमण केले.मा.उच्च न्यायालयापर्यंत प्रकरण गेले.१०-१५ हजार लोक जाऊ शकतात परंतु त्या रस्त्यावरील अतिक्रमण अदयाप काढले नाही.खंडागळे म्हणून व्यक्तीचे अतिक्रमण आहे ते काढावे रस्ता मोकळा करावा.

मा.आयुक्त :हर्सुल जेलच्या भोवताली हे बांधकाम झाले.संवेदनशील विषय आहे.जेलच्या सरंक्षणासाठी ठरावीक अंतरापर्यत बांधकाम होता कामा नये हे स्टँडर्ड रूल आहे हे रूल डावलून पुर्वी काहींनी परवानगी दिली असतील त्यांचेवर कार्यवाही होईल परवानगी रद्द केल्यानंतर बांधकाम केले असेल त्यांचेवर ही कार्यवाही होईल.

श्री.गजानन बारवाल :नगररचना विभागाने हे बघीतले का नाही.नुकसान झाले ते कसे देणार आहे.

श्री.भगवान घडमोडे :ले आऊट मंजूर करतांना परवानगी देतांना अधिका-यांना माहित नव्हते. का सामान्य लोकांनी कर्ज काढून सर्व पुंजी खर्च करून घर बांधले. आपणच नियम डावलतो.नुकसान भरपाई बाबत विचार व्हावा.

श्री.रूपचंद वाघमारे :१-१ कोटी खर्च करून घरे बांधलेली आहे प्रत्येकांना एवढा खर्च देणार का ?

श्री.विजय औताडे :सन २००६-०७ लेआऊट मंजूर केला २२५ प्लॉट आहे हा लेआऊट मंजूर होत नव्हता.१-२ वर्ष संचिका थांबून होती अधिकारी यांनी मंजूरी दिली ही जागा जेलला व नाल्यास लागून आहे.ही जागा एन ए होत नव्हता कोणत्या अटी शर्तीनुसार केला ५०० क्वे.फुट प्रमाणे प्लॉट घेतले आजची किमंत १२ लक्ष जवळपास २५-३० कोटीचे व्यवहार होते. २०-३० लक्षचे बांधकाम केले. ले-आऊट करतांना ५ एनओसीची मागणी होते ती घेतली का?

श्री.अयुब जहागीरदार गुलाम जिलानीः खुलासा केला समाधानकारक नाही कोणीही व्यक्ती पुर्ण कमाई खर्च करीत असेल व तेथे अशा प्रकारे काम करणार असेल तर योग्य नाही. घर बांधणे सोपे नाही.परवानगी असलेल्या ठिकाणचे घरे तोडणार असेल तर त्या लोकांची नुकसान होणार त्याची जबाबदारी कोण घेणार आहे.

मा.महापौर :परवानगी दिली केंव्हा व रद्य कधी केली. परवानगी रद्य केल्यानंतरची बांधकामे की अगोदरची,एन ए मंजूरीच्या वेळेस एनओसी घेतली होती का?

उपअभियंता(न.र) :घरांचे बांधकाम पुर्ण झालेले नाही परवानगी जानेवारी १५ ला रद्य केली ले-आऊट मधील परवानगी या वर्षाभरातील नाही.

श्री.विजय औताडे :ले-आऊट कोणत्या निकषावर मंजूर झालेला आहे.

उपअभियंता(न र ) :बांधकाम परवानगी दिली होती नंतर रद्य केली.

श्री.विजय औताडे :परवानगी कुणी दिली चौकशी करावी योग्य निर्णय होणे अपेक्षीत आहे. तेथे अधिकारी तोडण्यासाठी गेलेले आहे.

मा.महापौर :या लोकांना पर्यायी व्यवस्था केली पाहिजे. ले-आऊटला मंजुरी दिली जाते पुन्हा रद्य केली जाते.या प्रकरणात मा.आयुक्त यांनी जातीने चौकशी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी बैठक संपल्यानंतर आयुक्तांनी स्थळ पाहणी करावी.

श्री.रूपचंद वाघमारे :तोपर्यत जी कार्यवाही करीत आहे ती थांबवावी.

श्री.राजू शिंदे :लिगल असलेले पाडणार आहे. परवानगी होती रद्य केली चौकशी होईपर्यत पुढील कार्यवाही थांबवावी.

श्रीमती माधुरी देशमुख :जेथे अतिक्रमण असेल तेथे नोटीस देऊन कार्यवाही होते हे अधिकृत असतांना नोटीस न देता कार्यवाही होते परवानगी रद्य का केली हे त्या नागरीकांना कळविले होते का अधिकृत ते अनधिकृत ठरवून कार्यवाही होत असेल तर योग्य नाही.

मा.आयुक्त :या प्रकरणात सखोल चौकशी करून माहिती दिली जाईल.

श्री.रूपचंद वाघमारे :तेथे अनुचीत प्रकार घडला तर यास मा.आयुक्त जबाबदार राहतील.

मा.आयुक्त :यात भावनात्मक न होता कायदयाचा विचार करून कार्यवाही करावी लागेल.

श्री.गजानन बारवाल :कोणतीही जागा घ्यायची असेल तर रितसर नोटीस देऊन कार्यवाही करावी लागेल.

प्रश्न क्रमांक ४० :स.श्री.वानखेडे राजगौरव यांचा प्रश्न

श्री.राजगौरव वानखेडे :जवळपास १५-२० दिवसापासून शहरात राकाज्चा विषय चर्चेला आहे. मा.पोलीस आयुक्तांचे अभिनंदन की त्यांनी तेथील हुक्का पार्लर बंद केले नंतर मनपास अनधिकृत रित्या हुक्का पार्लर चालू असल्याने समजले या पुर्वीच मनपाने कार्यवाही का केली नाही.बीओटीवर जागा दिली म्हणजे कुणी काही करायचे का? सदर जागी मा.महापौर, उपमहापौर मा.आयुक्त यांनी भेट दिली तेंव्हा तेथे घाणेरडी व्यवस्था जे की तेथे हुक्का, मसाज पार्लर चालते मी प्रश्न केला सीटीएस नं. १६२६१ मधील जागा बीओटीवर शलाका इंजिनियरींगला कोणत्या उद्देशासाठी दिली तेथे तलाव बांधणे आणि सलग्न सुविधा म्हणजे ॲमेनिटीसाठी दिले ॲमेनिटी म्हणजे काय कोणत्या स्पर्धा व विषय त्यात येतात.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:मा.महापौर,उपमहापौर,आयुक्त यांनी पाहणी केल्यानंतर ते साहित्य जप्त करण्याचे सुचना दिल्या ते साहित्य मनपाकडे आहे का? नागरीकांनी सांगितले की मनपाच्या गाळयामध्ये साहित्य नाही कुठे गेले.पंचनाम्यात सर्व गोष्टी नमुद नाही जे की त्यावर कोणताही गुन्हा दाखल होऊ नये. मा.कोर्टाने सील काढण्याचे आदेश केले कायदयानुसार मनपाने पंचनामा करावा त्याप्रमाणे झाले का?त्याची हा प्रश्न वार्डाचा नसुन शहराचा आहे.तेथे महिला भगीनी पोहण्यासाठी जात असे तेथे कॉपी करणे होत होते महिलाच्या सुरक्षेचा हा प्रश्न होता.सर्व महिला सदस्यांना विनंती की बीओटी कक्ष प्रमुख यांनी या संबधी सर्व खुलासा करावा अशी मागणी करावी.

श्रीमती सुनिता आऊलवार:हा महिला सुरक्षीततेचा प्रश्न, या बाबतीत कडक कार्यवाही व्हावी.

श्री.नितीन चित्ते :राकाज क्लबला मनपाचा ज्योतीनगरमध्ये लेआऊट मध्ये परवानगी दिली.ओपनस्पेसमध्ये ले-आऊट टाकता येतो का? BOT वर जागा देतांना बाजूच्या नागरीकांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले का? जेंव्हा मा.पोलीस आयुक्तांनी सांगितले की येथे इलिगल ॲक्टीव्हिटीज चालतात. त्यावेळीच मनपाने कार्यवाही का केली नाही? जेव्हा सील करण्यास गेले त्यानंतर स्वीमींग पुलवर कॅमेरा लावला ते कशासाठी? मा.न्यायालयाने सील काढण्याचे आदेश दिले. मनपाचे अधिकारी आनंदाने सील काढण्यासाठी जातात. ते छायाचित्र माझ्याकडे आहे (या वेळी छायाचित्र दाखवतात.)

श्रीमती माधुरी देशमुख :राकाज्चा विषय प्रत्येक महिलेचा, आईचा जिव्हाळ्याचा आहे. हुक्का पार्लर चालवून युवा पिढीला झिजवण्याचे काम होत होते. तेथील सील कसे काढले? हुक्का पार्लर चालू असतांना नियमाप्रमाणे नाही. त्यावर

गुन्हा का दाखल केला नाही? मा.पोलीस आयुक्तांची भेट घेतली मनपाने गुन्हा दाखल करायला पाहिजे तरच आम्हाला कार्यवाही करता येईल असे म्हटले. तेथे अवैध धंदे चालू होते. महिला व युवा पिढींसाठी योग्य नव्हते. संबधीतांवर गुन्हा दाखल होऊन फौजदारी कार्यवाही व्हावी. हे केले नाही त्याबद्दल निषेद व खेद व्यक्त करते. मसाज पार्लरमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे विश्वासाने महिला जात होत्या की मनपाने परवानगी दिली. परवानगी कशी आहे? हे कुणी बघत नाही. आजही राकाज् तर्फे स्विमींग पुल पुन्हा चालू केला. अशा गुन्हेगारी व्यक्तीचे एक राकाज् सोडला तर अनेक राकाज् निर्माण होतील.राकाज् क्लब बंद करावे व त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करावे.

कक्ष प्रमुख (बीओटी) :राकाज् लाईफ स्टाईल यांना स्वीमींग पुल व संलग्न सुविधा Amenity यास परवानगी दिली संलग्न सुविधामध्ये स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज,पुल टेबल स्पोर्ट पार्लर हे स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज मध्ये अनुज्ञेय आहे. माहिती नगररचना विभागाकडून मिळेल.

मा.उपमहापौर :स्पोर्ट ॲक्टीव्हिटीजसाठी नगररचना चे नियम काय आहे? जो वापर तेथे होत होता त्यांचा उल्लेख करारनाम्यात आहे का?

कक्ष प्रमुख (बीओटी) :त्यामध्ये Amenitys बिल्डींग आहे.

मा.उपमहापौर :हुक्का पार्लर,पुल टेबल,मसाज सेंन्टर हे करारामध्ये आहे का?

कक्ष प्रमुख (बीओटी) :अधिकृत जागामध्ये स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज असे आहे. अनधिकृत जे आहे ते नियमबाहय आहे.

मा.उपमहापौर :हुक्का पार्लर हे कोणत्या जागेत होते.

कक्ष प्रमुख (बीओटी) :हुक्का पार्लर हे अनधिकृत जागेत होते. पुल टेबल अधिकृत आहे परंतु ते अनधिकृत क्षेत्रात चालत होता.

मा.उपमहापौर :पुल टेबल अधिकृत म्हणून मेन्शन आहे का त्यासाठी परवानगी घ्यावी लागते की नाही? पुल टेबलसाठी परवानगी आहे का ?

कक्ष प्रमुख (बीओटी) :डीसी रूल प्रमाणे परवानगी घेतली स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज मध्ये येते.

मा.उपमहापौर :मुख्य गेट चालू होते की बंद होते. पलिकडे असलेले कोप-यातले गेट चालू की बंद होते.

कक्ष प्रमुख (बीओटी) :एक गेट चालू आहे एक बंद आहे. उत्तर बाजुचे गेट चालू आहे दक्षिण बाजूचे बंद आहे.

मा.उपमहापौर :दक्षिण बाजूचा गेट अगोदर चालू होता॰ पार्कींगची जागा नियमाने बरोबर आहे का?

कक्ष प्रमुख (बीओटी) :पार्कींगच्या जागेत अनधिकृत काम केले त्यात पुल टेबल, हुक्का पार्लर, म्युझीक क्लास, डान्स क्लास हे सर्व अनधीकृत होते. या बाबतीत पंचनामा केला आणि ते काढत आहोत.

श्री.रेणुकादास वैद्य :अनधिकृत होते तर कक्ष प्रमुख म्हणुन आपण काय कार्यवाही केली? आपले नियंत्रण नाही का?

श्री.राजगौरव वानखेडे :अधिकृत काय होते एक दिवसात हे सर्व झाले नाही.

या वेळी स.महिला सदस्या बागंडया घेऊन बीओटी प्रमुख यांचेकडे जातात. राकाज् बंद झाला पाहिजे अधिकाऱ्यांवर कार्यवाही झाली पाहिजे घोषणा देतात.

श्री.गजानन बारवाल :अनधिकृत होत होते बीओटी कक्ष प्रमुख यांनी कबुली दिली आहे.

श्री.भगवान घडमोडे :हुक्का पार्लर,पुल टेबल, मसाज पार्लर इलिगल होते. अधिकारी यांनी कबुली दिली. हे प्रकार केंव्हा पासून चालू होते? अधिकारी सांगतात हे सर्व तेथे चालू होते यांचा अर्थ अधिकारी त्यात आहे. त्यांचेवरही कार्यवाही व्हावी. महिला भगिनी विश्वास ठेवून जात होत्या तेथे काचेची फिल्म लावली होती तेथून निदर्शन करून पाहण्यात येत होते. हे सर्व प्रकार अधिकारी यांना माहित असावे स्वत: स्वार्थासाठी एवढे मोठे स्वह: गमवून बसणारे अधिकारी हे सर्व चालू होते सांगता तर कार्यवाही का केली नाही? मा.पोलीस आयुक्तांनी कार्यवाही केल्यानंतर प्रशासनाला जाग येते. थातूरमातूर पंचनामा केला. सामान काढण्यास मदत केली. त्यावेळी आपले कर्मचारी तेथे अमुक सामान जाऊ द्या. बीओटी प्रमुख सांगत होते जे ऑब्जेक्शनर सामान होते ते सर्व देऊन टाकले व सील करण्याचे नाटक केले. त्या प्रकारामध्ये मा.कोर्टात आपल्यावर नामुष्कीची पाळी आली. मा.कोर्टाने सील काढण्यास सांगितले. तेथील हार्ड-डीस्क मध्ये कोण आहे? काय काय झाले? कुठला प्रकार चालत होता? हे पहावे.स.पदाधिकारी पुढाकाराने तेथे गेले. हार्डडिस्क त्यांचेकडे दिली ती आता गायब केली. मी पत्र दिले चौकशी व्हायला पाहिजे.गैरकृत्य करणारे अधिकारी यामध्ये सामील असेल तर यात महापालिका व शहराची बदनामी होते हे खपवून घेतले तर लोक फोफवतील, मस्ती करतील व अवैध धंद्यास आपण प्रोत्साहन देतो असे होईल. करारनाम्यात काय तरतुद होती. ७.१६, ७.१९ मध्ये काय, त्यानुसार तेथे वापर होत होता का? बीओटी प्रमुख यांनी काय केले? सांगावे.

श्री.अफसर खान :स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज मध्ये मसाज पार्लर येत नाही.

मा.उपमहापौर :स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज मध्ये मसाज पार्लरला परवानगी दिली होती का?

कक्ष प्रमुख (बीओटी) :स्पोर्ट ॲक्टीव्हिटीज अनुज्ञेय आहे.

मा.उपमहापौर :करारनामा दि.७-५-२००७ ला केला त्यात स्पोर्ट ॲक्टीव्हिटीजला परवानगी दिली कम्प्लीशन ड्रॉईंग दि १५-४-२००९ ला सबमीट केले त्यात कुठेही उल्लेख नाही. एका कोप-यात मसाज म्हणून लिहिलेले आहे. हा नगररचना विभागाचा प्रॉब्लेम नाही बीओटीचा आहे. आताच मी माहिती घेतली नगर रचना विभागाने म्हटले की त्यांनी अभिप्राय कळविला. जे करारनाम्यात नाही तो अभिप्राय कसा कळवितात. हे कसे आले? हे बघण्याची जबाबदारी बीओटी कक्ष प्रमुख यांची होती. अनधिकृत ठिकाणी हुक्का पार्लर, पुल टेबल चालतो का? बघीतले नाही. हार्ड-डिस्क कुठे गेली? तेही सांगावे.

श्री.राजगौरव वानखेडे :मी प्रश्न दिला होता कार्यवाही विचाराधीन असे म्हटले म्हणजे काय? सर्व समोर दिसते आहे. गुन्हा दाखल का केला नाही. मा.न्यायालयात जाण्याची संधी देता हे बरोबर नाही.

श्री.अफसर खान :काय काय ॲक्टीव्हीटीज चालतात. हार्ड-डीस्क कोर्टासमोर आपल्या वकीलाने दाखवायला पाहिजे होती. मा.कोर्टाच्या समोर गेले असते तर सील काढण्याचे आदेश मिळाले नसते. जलतरण तलावासाठी परवानगी घेतली. मनपाने करारनामा केला तो रद्द करावा. तेथे तरूण महिला व मुली जात होत्या. माझ्या ओळखीचे उमेश नावाचे मित्र त्याने उस्मानपुरा पोलीस स्टेशनला तक्रार केली होती, परंतु राकाज्ने पोलीसांना मॅनेज केले व उमेश नावाचे व्यक्तीला मारण्याची धमकी दिली. मोठया बेइमान पणे रॅकेट चालू होते. ब्ल्यु कलरची काच लावलेली होती. आतले बाहेर दिसत नव्हते. परंतु बाहेरच्यांना आतले दिसत होते. मसाज पार्लर मध्ये कॅमेऱ्याची गरज नाही. परंतु तेथे ही कॅमेरे लावले होते. स्वीमींग पुल वर कॅमेरे लावले व हार्ड-डिस्कवर सर्रासपणे पाहत होते. हे चुकीचे आहे. केलेला करारनामा रद्द करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :सी.सी.टी.व्ही.चा वापर केला महिला व मुलींना ब्लॅकमेल करू शकतो.

श्री.भगवान घडमोडे :करार रद्य करून बीओटी प्रमुख वर कार्यवाही व्हावी. राकाज्शी काही संबंध असतील यांनी त्यास पाठीशी का घातले? हार्ड-डिस्क गायब कशी झ ााली? चौकशी करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांचे नाव दिले होते बीओटीवर दिल्यानंतर राकाज् नाव दिले तेथे नवीन ऑपरेटर नियुक्त करावे.

श्री.रामेश्वर भादवे :राकाज् जेंव्हा मा.न्यायालयात गेले तेंव्हा त्यांचे वकीलाने व मनपाच्या वकीलाने काय भुमिका मांडली?

श्री.राजू शिंदे :करार रद्य कसा होईल यासाठी विशेष अधिकारी नेमावे.

श्री.भगवान घडमोडे :७.१६,७.१९ हया करारातील अटी वाचल्या तर तज्ञाकडे जाण्याची गरज नाही. कार्यवाही करावी.

उपमहापौर :मा.आयुक्त यांनी स्वत: व्हिजीट दिली काय? काय चालत होते? हे पाहिले तेंव्हा सर्व चुकीचे चालत होते, म्हणून आदेशीत केले होते. मा.महापौर व मी स्वत: तेथे गेलो तेव्हा चुकीचे वाटले. हे साहित्य जप्त करावे असे सांगितले. २५-३० ए.सी., १०-१५ टीव्ही एलसीडीज्, ८-१० पुल टेबल होते हे सर्व संबंधीत व्यक्ती घेऊन गेले. हे साहित्य घेवून जाण्याची परवानगी दिली होती का? मा.महापौर जेंव्हा साहित्य जप्त करण्यास सांगतात तेंव्हा ते सामान घेऊन जाण्याची परवानगी कुणी दिली? केलेला करार दुर्दैवी आहे. त्यात ७.१६, ७.१७, ७.१९, ७.२१, ७.२३, ७.२५, ७.२८ मध्ये पॉईन्टस्चे उल्लंघन झाले. जर पोस्टर लावायचे असेल तर मनपाची परवानगी घ्यावी असे नमूद असतांना तेथे काय काय चालू होते उघड दिसत होते. हा करार रद्द करावा व मनपाने चालवावे.

श्री.राजगौरव वानखेडे :७.१९ नुसार करार रद्द करण्याची कार्यवाही करू शकतो. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. करारातील ७.१६, ७.१७, ७.१९, ७.२१, ७.२३, ७.२५, ७.२८ मध्ये काय आहे माहिती दयावी.

कक्ष प्रमुख (बीओटी) :७.१६ नुसार That it is further provided that without the written approval of AMC which shall not be unreasonably withheld the Occupant shall also not alter the original colour of the outside of the premises of the façade and front elevationnor erect own screens, curtains, or blinds on the exterior nor paste paper hand bills, advertisements, posters, notices etc. on the glass nor permitte the same to be made, fixed, altered or erected. यामध्ये परवानगी देण्यात आली त्यात बदल करा, वगैरे कोणतीही परवानगी दिली नाही. करारातील अट ७.१७ नुसार That the Occupant shall use the leased premises for doing the trade of Swimming Pool Complex and amenities building the change of the trade of the Occupant at any subsequent stage shall only be permissible with the prior written approval of the Commissioner,AMC and such approval shall not be withheld unreasonably. यात विकासक यांनी काही फेरबदल केले. एक ट्रेड साठी परवानगी आहे. जर दुसरा ट्रेड चालू केला तर महापालिका म्हणुन मा.आयुक्त हे कार्यवाही करू शकतात.

श्री.भगवान घडमोडे :मनपाकडे यासाठी किती वेळेस मागणी केली.

कक्ष प्रमुख -बीओटी :मनपाकडे आले नाही. करारातील अट ७.१९ नुसार That the Occupant shall not carry on any illegal activity in the lease premises. In case he/she/it does so, the lease granted under this agreement shall liable to be terminated forthwith without notice. यात त्यांनी इलिगल ॲक्टीव्हीटीज केली तर नोटीस न देता केंव्हाही बडतर्फ करता येते.

मा.महापौर :जे काम चालू होते ते अधिकृत की अनधिकृत, नियमानुसार काम चालू होते का? अटी शर्तीचे उल्लंघन केले की नाही.

कक्ष प्रमुख-बीओटी :या ॲक्टीव्हिटीज चुकीच्या आहे.

उपमहापौर :रि-चॉप कॉन्ट्रॅक्ट झालेला आहे की नाही या अंतर्गत त्यावर जबाबदारी फिक्स करू शकतो की नाही?

कक्ष प्रमुख -बीओटी :रि-चॉप कॉन्ट्रॅक्टवर यास टर्मीनेट करता येणार नाही.

उपमहापौर :इलिगल ॲक्टीव्हीटीज तेथे झाल्या की नाही प्रशासन मानते की नाही?

कक्ष प्रमुख -बीओटी :प्रुफ करावे लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य :अटी शर्तीचे उल्लंघन केले तर टर्मीनेट करता येते, आपण सांगता तसे करता येत नाही. सभागृहाचे मत राकाज् बंद झाला पाहिजे. राकाज्ला पाठीशी घालू नये नसता अधिकारी यांचेवर कार्यवाही होऊ शकते.

श्री.भगवान घडमोडे :अधिकारी सांगतात तेथे ॲक्टीव्हिटीज इलिगल होत्या. आता म्हणतात प्रुफ करू शकत नाही. अधिकारी यांनी हार्ड-डिस्क गायब केली. याचे तेथे संबध आहे. बीओटी कक्ष प्रमुखाकडील चार्ज काढावा. या प्रकरणाची सर्व चौकशी शहर अभियंता यांचेकडे दयावी व तो करारनामा रद्द करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :जे या प्रकरणात दोषी असेल त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

मा.महापौर :मा.कोर्टाने म्हटले होते की सील उघडून पंचनामा करावा व त्याचे बाबतीत पुढे काय करावे म्हटले होते.

कक्ष प्रमुख बीओटी :११ तारखेला मा.न्यायालयाने सांगितले की तेथे सील करावे मनपाने कार्यवाही चालू ठेवावी व जे निर्णय घ्यायचे ते घ्यावे मुभा आहे.

श्री.भगवान घडमोडे :अगोदर बीओटी कक्ष प्रमुख यांचा चार्ज काढावा. नसता अनेक राकाज् तयार करीत आहोत असे समोर येईल.

श्री.गजानन बारवाल :सर्व बीओटी प्रकल्पाची चौकशी करावी.

कक्ष प्रमुख बीओटी :११ जुलै २०१५ ला मा.न्यायालयाने म्हटले की सील करण्यात यावे. महापालिकेने जी ॲक्शन घेतली ती पुढे चालू करू शकता.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.कोर्टाने कसलाही वेगळा निर्णय दिला नाही. मनपाने केलेली कार्यवाही ही चालू ठेवावी म्हटले असे असतांना कार्यवाही होत नाही.

उपमहापौर :करार केला त्यानुसार उल्लंघन केले याचा अर्थ त्यांनी फसवले का? फसवले असेल तर गुन्हा दाखल करू शकतो की नाही?

कक्ष प्रमुख बीओटी :होय करू शकतो.

उपमहापौर :राकाज्वर कार्यवाही करू नका म्हणून आम्हा पदाधिकारी कडे लोक पाठवून दबाव आणतात का? ४२० गुन्हा दाखल व्हावा.

या वेळी अनेक स.सदस्य गुन्हा दाखल करण्याची मागणी करतात.

श्री.राजगौरव वानखेडे :राकाज् वर व संबधीत अधिकारी यांचेवर ही गुन्हा दाखला करावा ते दिशाभूल करीत आहे. हार्डडिस्क कुठे गेली? त्याचा खुलासा झाला नाही.

श्री.राजू शिंदे :राकाज् वर गुन्हा दाखल करून तो करार रद्द करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्तांनी त्यांची भुमिका स्पष्ट करावी.

उपमहापौर :अतिक्रमण करणारे गरीबांची घरे तोडतात. राकाज् इलिगल काम करीत असतांना त्यांचेवर गुन्हा दाखल होत नाही. त्यास पाठीशी घालत आहे. नियमात बसत नव्हते तर बीओटी कक्ष प्रमुख यांनी प्रशासनाच्या निदर्शनास का आणून दिले नाही? सर्वांवर गुन्हे दाखल करावे.

या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर येऊन राकाज्वर कार्यवाही करण्याची मागणी करतात.

मा.महापौर :सभा काही वेळासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ३.२० वा. पुन्हा सभा ४.०० सुरू)

श्री.राजगौरव वानखेडे :माझ्या प्रश्नाचा खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य :स्मार्ट सिटीचा ऐनवेळीचा प्रस्ताव आहे. आज शेवटची तारीख आहे. तो विषय पाठवायचा असल्याने मंजूर करावा. राकाज्वर कार्यवाही करावी तोपर्यंत ही सभा तहकूब करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :स्मार्ट सिटी चा ऐनवेळचा विषय मंजूर करावा. राकाज्च्या संदर्भात प्रशासनाच्या वतीने कार्यवाही करण्या बाबत व अहवाल ठेवण्या बाबत आदेशीत करावे. अहवाल देण्याची तारीख आजच ठरवून घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :राकाज्ने गैरकृत्य केले त्याबद्दल ४२० व अनधिकृत बांधकाम केले त्याबद्दल पोलीसात गुन्हा दाखल करावा.तो करार आजच रद्द करावा.

श्रीमती माधुरी देशमुख :सभा तहकूब करणे हा पर्याय नाही. कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :मा.आयुक्त हे मनपाचे प्रमुख आहे. शहरातील आरोग्याच्या दृष्टीने लक्ष दिले जावे. कचरा उचलला जात नाही, पाणी मिळत नाही, फवारणी होत नाही यातून नागरीक सुरक्षीत नाही. शहर स्मार्ट सिटी कडे वाटचाल करीत असतांना नागरीकांच्या समस्यांकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :जनतेच्या आरोग्याशी संबधी विषय आहे. गुंठेवारीमध्ये अधिकारी काम करीत नाही.

ऐनवेळचा विषय

मा.महापौर :स्मार्ट सिटी संदर्भातील ऐनवेळचा विषय ज्याला ६० क्रमांक येईल तो वाचून दाखवावा.

**विषय क्रमांक ६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व पर्यावरणपुरक शहरे तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान या महत्वाकांक्षी अभियानाची घोषणा भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी दिनांक २५.०६.२०१५ रोजी केली आहे. या केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे बाबत राज्य शासनाचे प्राप्त परिपत्रक आणि निर्देशानुसार विविध स्वरुपाची वैधानिक कार्यवाही करावी लागणार आहे. या अनुषंगाने प्राप्त सुचनेनुसार स्मार्ट सिटी प्रकल्पामध्ये देशपातळीवरील स्पर्धे करीता महाराष्ट्र राज्यामधुन नियोजीत १० शहरांपैकी औरंगाबाद शहराचा समावेश होणेस्तव औरंगाबाद महानगरपालिकेची संमती/इच्छा दर्शविण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेत ठराव पारीत होणे आवश्यक आहे.

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनाचे परिपत्रक क्रमांक:स्मार्टसि-२०१५/प्र.क्र.१३०/नवि-३३, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०१ जुलै २०१५ मध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियान हे खालील प्रमाणे दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

**अ. प्रथम टप्पा:-**

केंद्र शासनामार्फत प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाकडुन कळविण्यात आलेल्या राज्यातील एक लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या अभियान शहरातुन स्पर्धात्मक पध्दतीने १० शहरांची निवड करुन सदर शहरांची शिफारस केंद्र शासनाकडे केली जाणार आहे.

**ब. दुसरा टप्पा:-**

सदर अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्य शासनामार्फत निवड करण्यात आलेल्या शहरांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करुन तो केंद्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेज मध्ये सादर करणे अपेक्षीत आहे.

राज्यस्तरावरुन सदर शहरांची निवड करण्यासाठी केंद्र शासनाने सदर मार्गदर्शक सुचनांसोबतच्या परिशिष्ट ३ मध्ये कंडीशन्स प्रेसिडेंट व पात्रता गुणांक (स्कोरींग क्रायटेरिया) उपलब्ध केलेले आहेत. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार केंद्र शासनाच्या सदर निकषांची जास्तीत जास्त पुर्तता करण्यामध्ये सक्षम ठरणारे व केंद्रीय स्तरावरील आंतरराज्यीय स्पर्धेमध्ये पात्र होण्यास सक्षम ठरणारेच प्रस्ताव आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेंज मध्ये सहभागी होऊ शकतील. स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील १० शहरांची निवड करुन सदर शहरांची नावे केंद्र शासनास ३० जुलै २०१५ पुर्वी कळविणे बाबत शासन परिपत्रकात नमुद केले आहे.

सदर अभियानाच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी करावयाची पुर्व तयारी खालील प्रमाणे आहे.

**अ.** संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष ५० कोटी इतका निधी स्वहिस्सा म्हणुन उभा करु शकेल याबाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षमतेचा व नियोजनाचा तपशील शासनास कळविणे आहे.

**ब.** संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ५ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिवर्ष २०० कोटी इतका निधी खर्च करु शकेल याबाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यकारी क्षमतेचा व नियोजनाचा तपशील शासनास कळवावयाचा आहे.

**क.** स्मार्ट सिटी अभियानामध्ये नागरिकांच्या सहभागाबाबत संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नियोजन कसे करणार आहे याबाबतची माहिती कळवावयाची आहे.

**ड.** स्मार्ट सिटी अंमलबजावणी बाबतचा संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा दूरदृष्टीकोन (Vision) काय आहे याबाबतचा तपशील देखील शासनास कळवावयाचा आहे.

करीता केंद्र शासन पुरस्कृत **"स्मार्ट सिटी", "अमृत"** (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation), **"प्रधानमंत्री आवास योजना"** आणि **"स्वच्छ भारत अभियान"** या सर्व योजनांमध्ये ऐतिहासीक औरंगाबाद शहराचा समावेश होणे करीता आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करणे करीता महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करणे तसेच उपरोल्लेखित सर्व योजनांमध्ये शहराचा समावेश होणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्रीमती किर्ती शिंदे :मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी ही चांगली योजना आणली.

श्री.राजू शिंदे :यावर चर्चा नंतर करता येईल मंजूर करावे. शासनाकडे पाठवावे.

मा.महापौर :प्रशासनाचा महत्वाचा विषय आहे. शासनाकडे अहवाल पाठविणे आवश्यक असल्याने हा विषय मंजूर करण्यात येतो. यात म्हटले की मा.आयुक्तांना अधिकार दयावे. परंतु सर्व स.पदाधिकारी व गट नेते यांचे विचार विनिमय घेवून योग्य निर्णय त्या त्या वेळी घेण्यात यावा.

श्री.राजू शिंदे :यात काही बदल करायचे असेल तर सभागृहा समोर आणावेत.

श्रीमती किर्ती शिंदे :ही योजना प्रशासनाने हाती घ्यावी. नियोजनबध्द काम करावे.

श्री.भगवान घडमोडे :पुर्ण माहिती पुढील बैठकीत या विषयी द्यावी.

मा.महापौर :सदर विषय प्रशासनाचा अत्यंत महत्वाचा असून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासन पुरस्कृत **"स्मार्ट सिटी", "अमृत"** (Atal *Mission* for Rejuvenation and Urban Transformation)**,"प्रधानमंत्री आवास योजना"** आणि **"स्वच्छ भारत अभियान"** या सर्व योजनांमध्ये वरील अ,ब,क,ड मध्ये प्रस्तावित केल्यानुसार रुपये ५०.०० कोटींची आर्थिक तरतुद दरवर्षी वार्षीक अंदाजपत्रकात करण्यास त्याच प्रमाणे कमी महत्वाची इतर कामे कमी करून स्मार्ट सिटी आणि इतर योजनांसाठी पैसा कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यास व या योजनेत ऐतिहासीक औरंगाबाद शहराचा समावेश होणे करीता आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करणे करीता महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता देण्यात येते. तसेच उपरोल्लेखित महानगरपालिकेचे सर्व योजनांमध्ये शहराचा समावेश होणेसाठी तसेच या योजनेत जी कामे घ्यावयाची आहेत त्याबाबत शहरातील जनता आणि या सभागृहाच्या सुचना विचारात घेऊन स्मार्ट सिटी आणि इतर योजनांचे प्रस्ताव तयार करावेत. त्यामध्ये काही बदल करावयाचे झाल्यास याबाबत स.पदाधिकारी यांचेशी विचारविनिमय करून त्यास सभागृहाची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यासही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.राजगौरव वानखेडे :राकाज्‌वर निर्णय घेतला नाही. करार का रद्द केला जात नाही? आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.रेणुकदास वैद्य :राकाज्‌वर त्वरीत ॲक्शन घ्यावी. तोपर्यत सभा तहकूब करावी.

श्री.भगवान घडमोडे :राकाज्‌वर कार्यवाही करतांना चौकशी होणार आहे त्या संचिका बीओटी कक्ष प्रमुखाकडे असतील त्यांचेकडील चार्ज काढावा.

श्री.अफसर खान :करारनामा रद्द करावा. तसे आदेशीत करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :राकाज्‌च्या बाबतीत झालेली घटना ही घृष्णास्पद आहे. मनपाचे जागेवर कुणी काय करावे हे ठरविण्याचे अधिकार सभागृहाला आहे करारानुसार उल्लंघन केलेले आहे. तो करारनामा रद्द करावा. त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

श्री.गंगाधर ढगे :हे शहर स्मार्ट सिटी कडे वाटचाल करीत आहे. आनंदाची बाब आहे.

मा.महापौर :सर्वांच्या भावना विशेषतः महिलांच्या भावना लक्षात घेता राकाज् लाईफ स्टाईलला जागा ज्या माध्यमासाठी दिली व तेथे क्लब तयार केला होता. करारनाम्यात नाही असे उपक्रम तेथे चालू होते. नियमाचा भंग त्यांनी केलेला आहे. प्रशासनाला सुचना, की तीन दिवसाच्या आत सर्व कायदेशीर बाबींची तपासणी व पुर्तता करून त्यांचेवर कार्यवाही करावी. अहवाल सभागृहा समोर सादर करावा. तोपर्यत सभा तहकूब करण्यात येते.विषय क्रमांक २२ ते ५९ हे पुढील सभेत घेण्यात येतील.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.

इति.स.सा.सभा दि.२०.०७.२०१५
(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५)

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [५]

**सोमवार दिनांक २०.०७.२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री. मलके गोकुलसिंग संपतसिंग (प्रभाग क्रमांक ३५) :-**

**प्रश्न क्रमांक ५:-**

नारेगांव येथील कचराडेपो संदर्भात मनपाने पर्यायी व्यवस्था केली का? मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन केंव्हा होणार? महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमाचे पालन करतो का? नारेगांव येथील नागरीकांच्या आरोग्या संदर्भात मनपा प्रशासनाने काही उपाययोजना केल्या का?

**उत्तर:- बीओटी कक्ष प्रमुख,महानगरपालिका औरंगाबाद**

औरंगाबाद शहरातील तीन दिशेने असलेल्या मुख्य रस्ते (१) जालना रोड व त्याच्या परिसरातील जागा पाहण्यात आली परंतु या दिशेला चिकलठाणा येथे औरंगाबाद विमानतळ असल्याने कायद्याने तेथील जागा अंतिम करण्यात आली नाही. (२) अजिंठा हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे राष्ट्रीय पर्यटन स्थळ आहे व हर्सुल येथे औरंगाबाद शहराचा पाणी पुरवठा तलाव आहे.त्यामुळे या परिसरातील जागा अंतिम करणे शक्य झाले नाही. मुंबई रोडवर प्रसिध्द दौलताबाद किल्ला तसेच औरंगाबाद-मुंबई राज्य महामार्ग असल्याने या दिशेनेही जागा अंतिम करण्यात आली नाही. सर्व बाबींचा विचार करुन मौजे करोडी ता.जिल्हा औरंगाबाद मौजे तिसगांव, मौजे गांधीली, मौजे नायगांव,मौजे लायगांव,मौजे पोखरी, मौजे आडगांव,मौजे मिटमिटा इत्यादी शासकीय जमीनीची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. परंतु स्थानिक नागरिकांनी केलेल्या विरोधामुळे व इतर कारणांमुळे सदर जागा मनपास प्राप्त झाली नाही.

तसेच खाजगी जागा घेणे व विकास करणेसाठी तिसऱ्या वेळेस निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यात औरंगाबादच्या चारही बाजुच्या जमीनी निविदाधारक यांनी सदर प्रकल्पासाठी प्रस्तावित केल्या होत्या. त्यामध्ये मौजे चौका, सावंगी, नायगांव, जटवाडा, वडखा, जोगवाडा, रसुलपुर, वडगांव, माहोली, गांदेली, सिंदुन बिंदुन, मुस्तफाबाद, करोडी, जांभाळा, लायगांव इत्यादी जागेचा समावेश होता. दोन ठिकाणची जागा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची नियमावली MSW-२००० च्या अधिनियमा प्रमाणे योग्य होती व त्यासाठी संबंधित खात्याकडून ना हरकत प्रमाणपत्र हस्तगत करण्याची कार्यवाही सुध्दा करण्यांत आली होती. परंतु ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने सर्व प्रस्ताव रद्द करावे लागले.

तथापि, नविन कचरा डेपोसाठी औरंगाबाद शहराच्या चारही बाजुंना जागा मिळणेसाठी प्रयत्न चालू आहे. यापुर्वी काही जागांसाठी शासनाच्या विविध विभागांचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होतात तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व मा. विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावर देखील संबंधित उपलब्ध जागांबाबत होकार दर्शविण्यात येतो. परंतु त्या जागेस संबंधित ग्रामपंचायत नाहरकत देत नाही म्हणुन पुढे कार्यवाही प्रलंबित आहे. मो.आडगांव या ठिकाणी संबंधित ग्रामपंचायत यांनी नाहरकत न दिल्यामुळे तेथील प्रस्ताव प्रलंबित आहे. तसेच मो. तिसगांव व मो.पोखरी या ठिकाणच्या उपलब्ध जागांसाठी इतर शासकीय कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध असुनही ग्रामपंचायत यांनी नाहकरत प्रमाणपत्र न दिल्यामुळे पुढील कार्यवाही प्रलंबित आहे.

**प्रश्न क्रमांक ६:-**

शहरातील विविध भागातील “रमाई योजने” संदर्भात सर्व्हे केंव्हा सुरु होणार?

**उत्तर:- सहाय्यक प्रकल्प अधिकारी (NULM), राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना, महानगरपालिका औरंगाबाद.**

रमाई आवास योजने अंतर्गत निविदा प्रक्रिया चुकीची झाल्यामुळे, निविदा धारकांच्या तक्रारीमुळे निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे व फेर निविदा काढण्यास मा.आयुक्तांची मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी फेर निविदा काढण्याचे काम सुरु करण्यात येत आहे.निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार संबंधित एजन्सीमार्फत रमाई आवास योजने अंतर्गत सर्वेक्षणाचे काम पुर्ण करुन घेण्यात येईल.

**स.पालिका सदस्य श्री. शिंदे राजु रामराव (प्रभाग क्रमांक ३८):-**

**प्रश्न क्रमांक ०७:-**

१ सप्टेंबर २०१४ पर्यंत महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा करण्यात येत होता.त्यावेळेस कित्तेकवेळा उन्हाळ्यामध्ये मृत साठ्यातून पाणी उपसा करून शहराला एक ते दोन दिवसाआड पाणी पुरवठा करीत होतो. त्यावेळेस पाणी वितरण व्यवस्था सुरळीत होती. आता सद्यस्थितीत मृत साठ्यापेक्षा मुबलक पाणी साठा असतांनाही शहरात पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत का होऊ शकत नाही. याचे उत्तर देण्यात यावे.

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

मागील वर्षी अतिशय कमी पाऊस झाल्यामुळे जायकवाडी धरणात पुरेसा पाणीसाठा जमा होऊ शकला नाही. जायकवाडी धरणातील पाणी पातळी कमी असल्याने पंपाचा विसर्ग कमी झालेला होता. यापुर्वी व सद्यस्थितीतही जायकवाडी येथे पाण्याचा उपसा १४५ ते १५० द.ल.ली. इतका होत आहे. महानगरपालिकेतर्फे दि. ०१.१०.२०१२ पासून शहरास दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्या जायकवाडी धरणातील जिवंत पाणीसाठा ०.५ दलघमी पेक्षा कमी आहे. परिणामी पंपामध्ये गवत अडकण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे गवत पंपात जावून पाण्याची उचल कमी होते. त्यासाठी पाणबुड्याची व्यवस्था केली आहे. पंपामध्ये अडकलेले गवत पाणबुड्यामार्फत दर ८ तासांनी पंप बंद करुन काढावा लागल्यामुळे याचाही परिणाम पाणी वितरणावर झालेला आहे. तसेच पाणी पुरवठा योजनेवरील पंपगृहांचा विज पुरवठा गेल्या ५० दिवसात ४२ वेळा (MSEB Supply Trip) झाला होता. विज पुरवठा ५ मिनीटे जरी खंडीत झाला तरी त्याचा परिणाम पाणी वितरणावर पुढील सव्वातासा पर्यंत होतो. तसेच दिनांक ७,८ व ९ जून २०१५ रोजी नक्षत्रवाडी येथे विद्युत पुरवठा खंडीत झालेला होता त्याचाही परिणाम वितरण व्यवस्थेत झालेला आहे. योजनेवर एकूण ६ ठिकाणी असलेली पंपीग व शहराअंतर्गत विविध १० ठिकाणी बुस्टिंग पंपीग स्टेशन असल्याने यापैकी कुठेही विद्युत पुरवठ्यामध्ये खंड पडल्यास त्याचा परिणाम पाणी वितरणावर होतो. औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेवर २४ तास कार्यान्वीत आहे. विज पुरवठ्यामुळे लांबलेले पाणी वितरण हे नंतरच्या पाणी वितरणावर परिणाम करते व वितरण व्यवस्था पुर्व स्थितीत येण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागतो. सद्या योजना कन्सेशनर यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. योजना हस्तांतरण करतांना असलेल्या स्थितीनुसार कन्सेशनर मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत शहरातील ८० ते ९० टक्के पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

**प्रश्न क्रमांक ८:-**

समांतर जलवाहीनीच्या वितरण व्यवस्थेसाठी वापरण्यात येणाऱ्या DI आणि HDPE पाईप संदर्भात चालू असलेल्या वादासंदर्भात प्रशासन आणि महापौर यांचे तर्फे र.रु.१५३ कोटीचा मनपाचा फायदा होणार आहे. असे सांगण्यात येत आहे. करीता मनपाचा कशाप्रकारे फायदा होणार याची तपशिलावर माहिती देण्यात यावी.

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

समांतर जलवाहीनी योजनेच्या निविदामध्ये वितरण व्यवस्थेमध्ये संपुर्ण डी.आय. पाईप गृहीत धरुन सन २००८-०९ च्या दर सुचिवर काढलेल्या रुपये ७९२.२० कोटी प्रकल्प किंमतीवर कन्सेशनर यांनी पहिल्या वर्षासाठी रुपये ६३ कोटी AOSG मागितली आहे. जर मंजुर अटीशर्ती प्रमाणे राज्य व केंद्र शासनाने Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास मंजुरी दिल्यास प्रकल्पाची किंमत सन २००८-०९ च्या दर सुचिनुसार रुपये १५३.८२ कोटी कमी होऊन रुपये ६३८.३८ कोटी एवढी होणार आहे. शासन मान्यता देईल त्याप्रमाणात महानगरपालिका कन्सेशनरला देत असलेली AOSG कमी होईल. परिणामी महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे.

**प्रश्न क्रमांक ९:-**

DI आणि HDPE पाईप वापरण्या संदर्भात सभागृहामध्ये ठराव घेण्याची आवश्यकता होती का?

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

RFP ची निविदा कार्यवाही करताना तीन निविदापुर्व बैठका (Pre-bid Meetings) संपन्न झाल्या. त्यापैकी दिनांक १८.११.२०१० रोजीच्या तिसऱ्या निविदा पुर्व बैठकीमध्ये ''सध्या आधुनिक तंत्रज्ञान विकसीत High Density Poly Ethelene (HDPE) पाईपचा वापर इतर शहरांमध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकरीता सुरु झालेला आहे, या पाईपच्या वापरामुळे गळत्यांचे प्रमाण लक्षणीय रीत्या कमी होऊ शकते, त्यामुळे डी. आय. पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास मुभा द्यावी.'' अशी मागणी निविदा धारकांनी केली होती. यावर "केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे'' अशा अटींवर निविदा कार्यवाही करतांना RFP निविदेच्या वेळेस निविदा भरण्याच्या आधी सर्व निविदाधारकांना माहिती देण्यात आलेली होती. RFP निविदा कार्यवाही करतांना निविदाधारकांनी उपरोक्त बाब गृहित धरुन निविदा कार्यवाही केलेली आहे व या बाबी गृहित धरुनच सर्विस लेव्हल पॅरामीटर्स अंतिम करण्यात आले आहेत. या बाबीसह निविदेस दिनांक २२.०३.२०११ च्या स्थायी समितीमध्ये मान्यता प्रदान झालेली आहे. दिनांक १३-१४ जानेवारी २०१५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये वितरण व्यवस्थेमध्ये फक्त डी. आय. पाईप वापरावेत असे आदेश मा. महापौर यांनी दिले. परंतू निविदा कार्यवाहीमधील अटी व शर्ती व दिनांक १३-१४ जानेवारी २०१५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये मा.महापौर यांनी दिलेले आदेश यामध्ये विसंगती असल्याने आधिच काम सुरु होण्यास विलंब झालेला असल्याने निविदा धारकाने वाद निर्माण करुन कामांत अडथळा निर्माण करु नये म्हणून प्रशासनामार्फत प्रस्ताव ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली.

**प्रश्न क्रमांक १०:-**

समांतर प्रकल्पामध्ये माईलस्टोन प्रमाणे काम होत आहे का?

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

कन्सेशनर यांना योजना हस्तांतरणापासून तीन वर्षाच्या बांधकाम व पुनर्वसन कालावधीमध्ये योजनेची भांडवली खर्चाची नविन कामे पुर्ण करावयाची आहेत. या करीता कन्सेशन ॲग्रीमेंटमध्ये प्रत्येक तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये माईलस्टोन्स तयार करण्याची तरतुद आहे. त्यानुसार कन्सेशनर यांनी कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार सादर केलेल्या Quarterly Project Milestones ला औरंगाबाद महानगरपालिकेने मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत माहे जून ते ऑगस्ट २०१५ या तीमाहीमध्ये असलेल्या माईलस्टोननुसार कन्सेशनर मार्फत कामे प्रगती पथावर आहेत.

**प्रश्न क्रमांक ११:-**

करारनाम्याप्रमाणे प्रत्येक तीन महिन्याला स्थायी समितीस आढावा सादर करण्यांत आला का?

**उत्तर:-कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.**

कन्सेशनर सोबत दिनांक २२.०९.२०११ रोजी कन्सेशन ॲग्रीमेंट झालेले असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. या अनुषंगाने स्थायी समितीमध्ये घडून येणाऱ्या चर्चेमध्ये वेळोवेळी माहिती सादर करण्यात येते.

**स.पालिका सदस्या श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी (प्रभाग क्रमांक ४४):-**

**प्रश्न क्रमांक १२ ते १६:-**

**उत्तर:- मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्नाचा तपशिल | उत्तर |
|---|---|---|
| १२ (१) | महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार साप्ताहीक लेखा परिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. गेल्या पाच वर्षात किती अहवाल स्थायी समिती समोर ठेवण्यात आले? | होय, लेखापरीक्षण विभागाने लेखा शाखेकडे वेळोवळी जमा खर्चाचा साप्ताहिक अहवाल तयार करणेसाठी मागणी केलेली आहे. मात्र लेखा विभागाने साप्ताहिक जमा खर्च सादर न केल्यामुळे साप्ताहिक लेखापरीक्षण अहवाल मा.स्थायी समिती समोर सादर करता आला नाही. |
| १३ (२) | गेल्या पाच वर्षाचे लेखापरिक्षण करण्यात आला काय? त्या लेखा परिक्षण अहवालाच्या प्रति स.सदस्यांना देण्यात याव्यात. | होय, मनपा अधिनियम,१९४९ मधील तरतुदी नुसार लेखापरीक्षण अहवाल मा.स्थायी समितीस सादर करणे बाबत तरतुद असल्याने त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येते. |
| १४ (३) | प्रत्येक वर्षी मनपा प्रशासनाचे लेखा परिक्षण करणे आवश्यक आहे काय? हि जबाबदारी कोणाची आहे? | होय, ही जबाबदारी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम १०६ नुसार मुख्य लेखापरिक्षक यांची तसेच कलम १०७(अ) नुसार संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षक महाराष्ट्र राज्य यांची आहे. या व्यतिरीक्त महालेखापाल कार्यालया मार्फतही महानगरपालिकेचे लेखापरीक्षण करता येते. |
| १५ (४) | मनपा अस्तित्वात आल्यानंतर किती वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समिती समोर ठेवण्यात आले? | सन १९८३ ते २०१४ पर्यंतचे लेखापरीक्षण अहवाल मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेले आहेत. तेसच १९९६-९७ ते सन २००८-०९ पर्यंतचे अहवाल मनपाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलले आहेत. |
| १६ (५) | गेल्या पाच वर्षात स.सदस्यांना लेखा परिक्षण अहवालाच्या प्रति नियमानुसार वेळोवेळी देण्यात आल्या का? नसल्यास त्याची कारणे व त्यास जबाबदार कोण? | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम १०६ (३) नुसार लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती मा.स्थायी समितीस सादर करणे बाबत स्पष्ट तरतुद असल्याने त्यास अनुसरुन लेखापरीक्षण अहवाल मा.स्थायी समितीकडे सादर केला जातो. |

**स.पालिका सदस्य श्री. कैलास लक्ष्मण गायकवाड (प्रभाग क्रमांक ११३):-**

**प्रश्न क्रमांक १७:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (ब) हे, जी पदे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सन-२०११ च्या अगोदर पासुनच मंजुर आहेत त्यांना लागु आहे काय?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १८:-**

कोणत्या अधिकाऱ्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ४५(ब)(१) च्या तरतुदीनुसार नियुक्ती करणेसाठी पद किंवा पदांचा संवर्ग राजपत्रात अधिसुचित करणे विधी संमत आहे, त्यानुसार कोणकोणती पदे औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या राजपत्रात अधिसुचित केलेली आहेत काय?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक १९:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (ब)(२) नुसार प्रश्न क्र.०२ मध्ये उपस्थित प्रश्नानुसार राज्य शासनाने अधिसुचित केलेली पदे भरण्याबाबत अधिकाऱ्यांच्या संवर्गाचे (यात यापुढे ज्यांचा निर्देश **पुरक संवर्ग** असा केला आहे) त्याचे वर्णन अधिसुचनेत अंतर्भुत केलेले आहे काय?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक २०:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (ब)(३) नुसार अधिसुचना काढल्यानंतर अधिसुचित करण्यात आलेल्या पदांच्या संख्ये इतकी पदे पुरक संवर्गात निर्माण करुन पुरक संवर्गातील पदांच्या संख्याबळात वाढ करण्यात आलेली आहे काय?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक २१:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (ब)(४) नुसार पुरक संवर्गात निर्माण केलेली वाढीव पदे, शक्यतोवर संबंधित महानगरपालिकेच्या एका किंवा अनेक योग्य अधिकाऱ्यांची राज्य शासन, नियमांद्वारे विहित करील अश्या रितीने निवड करुन भरण्यात येणे बाबत तरतुद आहे. या तरतुदीनुसार आस्थापना-१ प्रमुख उपआयुक्त (म) यांनी काय कार्यवाही केलेली आहे?

**उत्तर:- अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री. जहाँगीर खान अब्बास खान मुलानी (प्रभाग क्रमांक २७):-**

**प्रश्न क्रमांक २२:-**

दिनांक २८.०८.२०१४ रोजी मा.आयुक्त मनपा औरंगाबाद यांना पत्र देऊन श्री.शिवाजी बाबूराव झनझन,मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी सन ३/१/१९७० रोजीच्या जन्मचा खोटा प्रमाणपत्र दाखल केल्या बद्दल तक्रार दिली होती या तक्रारीवर कोणती कार्यवाही झाली. चौकशी अहवालाची प्रत देणे व येणारी सर्व साधारण सभेत माहिती देण्यांत यावी.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक २३:-**

दिनांक ०३.०२.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७३० व ठराव क्र.७३१ प्रमाणे वार्ड क्र.२८ मध्ये नेहरुनगर,कटकटगेट लगतचा नाला व औरंगाबाद टाईम्स् कॉलनी नाल्याची रुंदी कमी करुन अतिक्रमण झाले असून प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात आलेली होती या प्रकरणांत कोणती कार्यवाही झालेली आहे याची माहिती सर्वसाधारण सभेत देण्यात यावी.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक २४:-**

दिनांक २४.११.२०१४ रोजी सिटीएस नं.११३१४/१/१- ११३१४/१/२, ११३१४/१/३ या मनपाच्या जागेवर अतिक्रमण करुन विना परवानगीचे बांधकाम तात्काळ पाडण्यासाठी पत्र दिले होते या प्रकरणांत झालेल्या कार्यवाहीची माहिती येणाऱ्या सर्वसाधारण सभेत देण्यांत यावी या मनपाचे जागेवर अतिक्रमण होऊन विना परवानगीने बांधकाम झालेले आहे ते आजपर्यंत पाडण्यात आलेले नाही. कारण काय आहे व हे कधी पाडणार आहे याचा खुलासा करुन कळविण्यात यावे.

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक २५:-**

दिनांक २९.०६.२०१५ रोजी माझे वार्ड क्र.२७ मधील बाबर कॉलनी भागात विद्युत डी.पी.पासुन ते तहा मस्जीद या रस्त्यावर फक्त एक फुट रस्ता खोदुन वरचे वर अंदाजे २०० ते २५० फुट पाण्याची पाईप लाईन टाकरण्यात आलेली असून सदरील पाईप लाईन डी.आय.पाईप ऐवजी ए.सी. (सिमेंट) ची पाईप लाईन टाकण्यात आलेली असून काही पाईप टाकण्याचे काम बाकी असतांना सदरील प्रकरण उघडकीस आलेले आहे.

वॉटर युटीलीटी कंपनीचे श्री शिवानगी तथा श्री.मुजुमदार यांना तात्काळ साईटवर बोलवुन हा प्रकार त्यांना दाखविण्यांत आलेला आहे त्यांनी स्थानिक वर्तमान पत्र औरंगाबाद टाईम्सचे वार्ताहर व स्थानिक केबल न्युज चॅनल एम.सी.एन. समोर त्यांची चुक मान्य केलेली आहे. परंतु त्यांनी या भागातील सर्व कनेक्शन तोडलेले आहे त्यामुळे सणावाराच्या दिवसात पाण्यासाठी या भागात भांडणे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास कोण जबाबदार आहे मनपा प्रशासन, युटीलीटी कंपनी, किंवा पाईप लाईन टाकणारा गुत्तेदार या पैकी कोण कोणास अंधारात ठेवुन काम करीत होते याचा खुलासा व्हावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)**

या प्रकरणात कन्सेशनरच्या प्रतिनिधीकडे अधिक चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, आपल्यामार्फत आपल्या स्वीय सहाय्यक यांनी उपलब्ध असतील ते पाईप टाकून नागरिकांना रमजान महिना असल्याने तात्काळ पाणी पुरवठा सुरू करावा अशी मागणी केल्यानंतर या ठिकाणी ए.सी.पाईप टाकण्याचे काम करण्यात आले, तथापि आपण घेतलेल्या आक्षेपामुळे सदरचे काम कन्सेशनरमार्फत बंद करण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक २६:-**

समांतर जलवाहीनी करारामध्ये ए.सी.सिमेंट पाईप लाईन टाकण्याची अट आहेत का? नसल्यास या प्रकरणी संबंधित कंपनीवर मनपा प्रशासना तर्फे फसवणुक केल्याप्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही प्रस्तावित करता येते का? खुलासा व्हावा.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)**

कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार समांतर जलवाहीनी प्रकल्पाअंतर्गत ए.सी.पाईप टाकण्याचे नियोजन नाही. तथापि शहराअंतर्गत अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमध्ये देखभाल दुरूस्ती करीता ए.सी.पाईप तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यात येतात. कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार जलवाहिन्या बदलतांना हायड्रोलिक मॉडेलप्रमाणे नवीन जलवाहिन्या टाकण्याची कामे करण्यात येणार आहेत. त्यावेळेस जलवाहिन्या बदलण्यात येणार असल्याने महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**स.पालिका सदस्य श्री. नंदकुमार राधाकिसन घोडेले (प्रभाग क्रमांक १०७):-**

**प्रश्न क्रमांक २७:-**

औरंगाबाद शहरात महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण रहिवासी व वाणिज्य वापर असलेल्या उदा. सामाजिक वापर, शैक्षणिक वापर, केंद्र, राज्य सरकारी, निम सरकारी कार्यालये, सिनेमा थिएटर्स, खुली जागा हॉटेल, पेट्रोलपंप, व्यापारी संकुल, नाटयगृह इत्यादी किती मालमत्तांना वर्गवारीनुसार कर लागलेला आहे तसेच किती मालमत्तांना अद्याप मालमत्ता कर लागलेला नाही.

सविस्तर मालमत्ता निहाय माहिती द्यावी. तसेच त्यांना त्यांच्या वापरानुसार लागलेला मालमत्ता कर किती याबाबत माहिती द्यावी.

**उत्तर:- कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहरात महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण रहिवासी वाणिज्य वापर असलेल्या मालमत्तांची संख्या.

**वार्ड निहाय मालमत्ता संख्या खालील प्रमाणे**

| वार्ड | मालमत्ताची संख्या | निवासी | व्यावसायीक |
|---|---|---|---|
| अ | ३०,९१८ | २५,२६१ | २,०३० |
| ब | ३८,७४४ | ३२,४१० | २,५९५ |
| क | २२,४२८ | १९,८२४ | १,०६० |
| ड | २६.००९ | १९,१९४ | ५,६८६ |
| ई | ३१,४७२ | २५,४२० | १,८१९ |
| फ | ४४.२४६ | ३५,९११ | ४,३०५ |
| एकुण | १,९३,८१७ | १,५८,०२० | १७,४९५ |

**प्रश्न क्रमांक २८ :-**

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत मालमत्ता कर हे आहे. मागील तीन वर्षा मध्ये वसुलीचे उद्दिष्ट व प्रत्यक्षात झालेली वसुली याबाबतची माहिती द्यावी.

**उत्तर:- कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

**(वर्ष २०१२-१३) वसूली तक्ता**

| (०१.०४.२०१२ ते ३१.०३.२०१३) मालमत्ता कर व पाणीपट्टीचा वसूली तक्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वॉर्ड | उद्दिष्ट | मालमत्ता कर वसुली | पाणीपट्टी वसुली | एकुण वसुली | शेरा |
| अ | - | ६,४७,१०,५५४ | १,६७,६१,०९७ | ८,१४,७१,६५१ | ५ |
| ब | - | ११,७३,४८,२६१ | ३,४९,९२,२४४ | १५,२३,४०,५०५ | ३ |
| क | - | २,८८,१२,९१८ | १,२७,४३,८८९ | ४,१५,५६,८०७ | ६ |
| ड | - | १४,३२,३५,६५९ | ३,२५,६७,६७३ | १७,५८,०३,३३२ | २ |
| ई | - | ७,२३,९१,४९० | २,२७,३३,८४७ | ९,५१,२५,३३७ | ४ |
| फ | - | १४,८९,१०,०६० | ३,६६,१७,८५१ | १८,५५,२७,९११ | १ |
| एच.ओ | - | ५७,८४,६३२ | १२,१३,७६२ | ६९,९८,३९४ | |
| एकुण | ८०.०० कोटी | ५८,११,९३,५७४ | १५,७६,३०,३६३ | ७३,८८,२३,९३७ | |

(वर्ष २०१३-१४) वसूली तक्ता

| (०१.०४.२०१३ ते ३१.०३.२०१४) मालमत्ता कर वसुली तक्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वॉर्ड | उद्दिष्ट | मालमत्ता कर वसुली | टक्केवारी % | पाणीपट्टी वसुली | एकुण वसुली |
| अ | १६.०० | ७,४६,०१,१६२ | ४६.६२ | ३,१६,४७,०४० | १०,६२,४८,२०२ |
| ब | २३.०० | १४,९९,९५,७३५ | ६५.१७ | ५,३८,६७,७८९ | २०,३८,६३,५२४ |
| क | १३.०० | ३,५०,८८,६७५ | २६.९२ | १,७१,९२,८५६ | ५,२२,८१,५३१ |
| ड | २४.०० | १५,१२,९९,९१२ | ६३.०० | ४,४८,५२,०६३ | १९,६१,५१,९७५ |
| ई | १५.०० | ७,९३,९१,१२५ | ५२.८७ | ३,३५,८६,४५२ | ११,२९,७७,५७७ |
| फ | २४.०० | १५,३०,१८,३१५ | ६३.७५ | ४,७६,९३,००२ | २०,०७,११,३१७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एच.ओ. | - | २,५१,१७,७६१ | - | ३,८६,२८२ | २,५५,०४,०४३ |
| एकुण | ११५ कोटी | ६६,८५,१२,६८५ | ५८.१३% | २२,९२,२५,४८५ | ८९,७७,३८,१७० |

(वर्ष २०१४-१५) वसूली तक्ता

| (०१.०४.२०१४ ते ३१.०३.२०१५) मालमत्ता कर वसुली तक्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वॉर्ड | उद्दिष्ट | मालमत्ता कर वसुली | टक्केवारी | पाणीपट्टी वसुली | एकुण वसुली |
| अ | १४.२३ | ९,८९,४४,१९६ | ६९.५०% | ५५,८८,५७२ | १०,४५,३२,७६८ |
| ब | २३.४७ | १५,५५,५२,०४० | ६६.२५% | १,१३,०७,४३० | १६,६८,५९,४७० |
| क | १०.४८ | ४,३७,१५,०२४ | ४१.६९% | ३३,४८,७३३ | ४,७०,६३,७५७ |
| ड | १६.२५ | १३,०३,९१,३३२ | ८०.१८% | १,०८,९५,८६१ | १४,१२,८७,१९३ |
| ई | १३.६० | ९,४९,५४,३२९ | ६९.७७% | ८४,३८,८६८ | १०,३३,९३,१९७ |
| फ | २१.८६ | १८,२९,२६,४३७ | ८३.६६% | १,५२,०७,०४९ | १९,८१,३३,४८६ |
| एच.ओ. | - | १,४०,१४,४७१ | - | ० | १,४०,१४,४७१ |
| एकुण | १०० कोटी | ७२,०४,९७,८२९ | ७२.०५% | ५,४७,८६,५१३ | ७७,५२,८४,३४२ |

**टिप :** सप्टेंबर २०१४ पासुन पाणीपटटी वसुलीचे काम औरंगाबाद वाटर युटिलिटी कंपनी यांचे कडे देण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक २९:-**

शहरात उभे असलेले एकुण किती मोबाइल कंपन्याचे व किती टॉवर्स आहेत, त्यांचे पासून अपेक्षित असलेले उत्पन्न व किती टॉवर अनधिकृत आहेत तसेच सध्या ज्या इमारतीवर, जागेवर ते टॉवर उभे आहेत, त्या जागेचा इमारतीचा तपशील उदा. आरक्षण, जागेच्या वापरास महानगरपालिकेने दिलेली परवानगी, कर आकारणी इत्यादी बाबत माहिती द्यावी.

**उत्तर:- कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

शहरात उभे असलेले वार्ड निहाय एकुण मोबाईल टॉवर व कंपनीचे नाव खालील प्रमाणे : (वार्ड अ ते फ एकुण मोबाईल टॉवर ३९१ )

| वार्ड-अ अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या | वार्ड-ब अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या | वार्ड-क अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एअरटेल | ९ | १ | बी.एस.एन.एल. | १२ | १ | एअरटेल | ४ |
| २ | वोडाफोन | ९ | २ | टाटाइंडीकॉम | ३ | २ | बी.पी.एल मोबाईल | ३ |
| ३ | इंडस | ३ | ३ | सेंच्युरी इन्फोसिस लि | ४ | ३ | ऐण्डस टॉवर | ४ |
| ४ | २१ सेनच्युरी | ८ | ४ | डब्ल्यु टी.टी.आय.एल | ३ | ४ | रिलायन्स जी .ओ. | ४ |
| ५ | व्हि.ओम | ५ | ५ | क्युपिक टेलको | १ | ५ | रिलायन्स इन्फ्राकॉम लि | ३ |
| ६ | टाटाइंडीकॉम | १ | ६ | व्हीयोग नेटवर्क लि. | ३ | ६ | बी.एस.एन.एल. | ३ |
| ७ | रिलायन्स | १० | ७ | रिलायन्स इन्फ्राकॉम लि | १३ | ७ | एअरसेल | २ |
| ८ | बी.एस.एन.एल. | ९ | ८ | बी.पी.एल मोबाईल | ५ | ८ | भारत सेल्युलर | १ |
| ९ | एम.एस.ई.बी. | १ | ९ | इंडस टेलिकॉम प्रा.लि. | ५ | ९ | QPQ | १ |
| १० | एअरसेल | १ | १० | एअरटेल | ७ | १० | टाटा टेलि. | १ |
| ११ | आयडिया | ५ | ११ | इंडस/रिना मंगेश निकम | १ | ११ | वोडाफोन | २ |
| १२ | एक्मी | १ | १२ | हच एस्सार | २ | १२ | आयडीया | १ |
| १३ | - | - | १३ | इसार सेल्युलर | ५ | १३ | वायरलेस टी.टी. | ५ |
| १४ | - | - | १४ | एक्सेल टेलिकॉम | २ | १४ | ए.सेण्ड टेलि. | १ |
| १५ | - | - | १५ | आयडीया | ७ | १५ | हयुजेस | १ |
| १६ | - | - | १६ | टॉवर व्हीजन इंडिया | १ | १६ | - | - |
| एकुण टॉवर | | ६२ | एकुण टॉवर | | ७४ | एकुण टॉवर | | ३६ |

| वार्ड-ड अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या | वार्ड-ई अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या | वार्ड-फ अ.क्र. | कंपनीचे नाव | मोबाईल टॉवरची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एअरसेल | १ | १ | २१ स्ट सेच्युरी इंफ्रा टेली | ६ | १ | बी.एस.एन.एल. | १३ |
| २ | इस्सार | ३ | २ | इंडस | ५ | २ | एअरसेल | ३ |
| ३ | वोडाफोन | १३ | ३ | एस्सार टेलिकॉम टॉवर | २ | ३ | इंडस | ७ |
| ४ | टाटाइडीकॉम | १६ | ४ | टाटा मोबाईल | २ | ४ | आयडिया | ९ |
| ५ | बी.एस.एन.एल. | १२ | ५ | बी.एस.एन.एल. | ७ | ५ | बी.पी.एल. | ३ |
| ६ | एअरटेल | ७ | ६ | भारती एअरटेल | ४ | ६ | एअरटेल | १० |
| ७ | आयडिया | ८ | ७ | रिलायन्स मोबाईल | ५ | ७ | वोडाफोन | २ |
| ८ | जी.टी. एल. | ५ | ८ | वायरलेस टी.टी.ईमको | ४ | ८ | टाटाइडीकॉम | १८ |
| ९ | इंडस | ५ | ९ | वोडाफोन | ३ | ९ | इस्सार | १० |
| १० | रिलायन्स | ९ | १० | हच एस्साअर वोडाफोन | ३ | १० | रिलायन्स | १३ |
| ११ | इतर टॉवर तुलीप | १ | ११ | एअरसेल | २ | ११ | भारती टेली | १ |
| १२ | इतर टॉवर सिफी | १ | १२ | आयडीया | २ | १२ | टॉवर व्हीजन इंडिया | १ |
| १३ | - | - | १३ | ए.टी.सी.इडीया टॉवर | १ | १३ | - | - |
| १४ | - | - | १४ | एक्मे टेलिकॉम | १ | १४ | - | - |
| १५ | - | - | १५ | क्युपो टेलिकॉम इंफ्रा | १ | १५ | - | - |
| एकुण | | ८१ | एकुण | | ४८ | एकुण | | ९० |

**उत्तर:- सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

आधुनिक तंत्राचे वापरामुळे दळणवळण क्षेत्रात झालेल्या क्रांतीकारक बदलामुळे शहरात मोबाइल फोन सेवा पुरविणाऱ्या अनेक कंपन्याकडून मोबाईल फोन सेवे करीता शहरात विविध मोबाईल टॉवर उभारलेले आहेत/उभारण्यात येत आहे. प्रशासकीय विभाग/कर अधिकारी विभाग यांच्या सर्व्हेक्षणानुसार शहरातील एकुण टॉवरची संख्या ३५४ इतकी आहे.

मोबाईल फोन टॉवर्स बाबत शासनाचे स्पष्ट धोरण/निर्देश नाहीत. प्रथम दिनांक ०४.०७.२००५ ने प्राप्त निर्देशानुसार प्रिमियम आकारून परवानगी देण्याची कार्यवाही करता त्यास संबंधीत कंपन्यानी मा.उच्च न्यायालयात आक्षेप नोंदवून याचिका दाखल करता त्या संबंधाने मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिनांक ०८.०३.२००७ ला उक्त शासन आदेश रद्द करण्याचे आदेश दिलेले आहेत. प्रत सुलभ संदर्भाकरीता सोबत जोडली आहे. यामुळे या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याबाबत लागू विकास नियंत्रण नियमावली मधील तरतुदी स्पष्ट नसल्याने व शासन स्तरावरील कोणतेही धारण निश्चित नसल्याने उभारण्यात येणाऱ्या टॉवर्स संबंधाने कार्यवाही करण्याकरीता धारेण निश्चिती होणे आवश्यक असल्यामूळे औरंगाबाद महानगरपालिका स्तरावर महानगरपालिकेने प्रस्ताव सादर करून मा.सर्वसाधारण सभेच्या दिनांक ०२.०३.२००९ च्या सभेत ठराव क्रमांक-४४२ ने ठराव मंजुरी घेऊन कार्यवाही सुरू करता त्यास संबंधीत कंपन्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे याचीका दाखल केल्या आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या दरम्यानच्या आदेशा संबंधाने टॉवर्स उभारणीमुळे मानवी आरोग्यावर काही अपाय होतात किंवा कसे याबाबत महाराष्ट्र प्रदुषण मंडळ, महाराष्ट्र शासनाकडे तसा पत्र व्यवहार करण्यात आला. त्या संबंधाने शासन स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.

आता शासन निर्णय क्रामंक टिपीएस-१८१०/१९७५/प्र.क्र.नवीन-६४/१२प्रयो/नवि-१३, दिनांक ०४ मार्च २०१४ मध्ये नमुद नियमानुसार व अटी व शर्तीस आधीन राहून मोबाईल टॉवर उभारणीस परवाना देण्यात येत आहे.

उक्त शासन निर्णयानुसार या विभागामार्फत आतापर्यंत एकुण २८ मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भाकरीता सदरची यादी सोबत जोडण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ३०:-**

मंजुर रेखांकन, बांधकाम परवानगी व इतर माध्यमातून हस्तांतरित झालेली महानगरपालिकेची एकूण रस्ते व खुल्या जागा व आरक्षित जमिनी/मालमत्ता किती व कोणत्या, सध्या त्यांचा वापर काय सुरु आहे?म्हणजे सार्वजनिक अथवा खाजगी अशा प्रकारे महानगरपालिकेच्या नावावर सध्या किती मालमत्ता आहेत व किती मालमत्तांची नोंद ७/१२, पी.आर कार्डवर घेणे बाकी आहे?

**उत्तर:- अप्राप्त.**

**प्रश्न क्रमांक ३१** :-

महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासुन एकुण किती रेखांकने व बांधकाम परवाना मंजुर झाले त्याचे प्रकरण निहाय माहिती देण्यात यावी. तसेच भोगवटा प्रमाणपत्र किती मालमत्ता धारकांनी घेतलेले आहे याची माहिती देण्यात यावी.

**उत्तर:- अप्राप्त.**

**स.पालिका सदस्य श्री. शेख जफर अख्तर (प्रभाग क्रमांक ६०):-**

**प्रश्न क्रमांक ३२:-**

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ३२ | वार्ड क्र.६० इंदिरानगर (ऊत्तर) बायजीपूरा गल्ली क्र.८ नूर गेट लगत म.न.पा.ने बांधलेले सांस्कृतिक सभागृह कित्येक वर्षापासून खाली पडलेले आहे. त्या सभागृहाच्या टेरिसवर दारु गांजा पिणाऱ्या लोकांच्या अड्डा तयार केलेला आहे. हे सभागृह का उपयोगात घेण्यात येत नाही. याचा खुलासा करण्यात यावा. | वार्ड क्र.६० इंदिरानगर (ऊत्तर) बायजीपूरा गल्ली क्र.८ नूरगेट लगत म.न.पा.ने बांधलेले सांस्कृतिक सभागृह हे साई सेवा क्रीडा बहुउद्देशीय मंडळ यांना भाडे तत्वावर देण्यात आलेला आहे. त्यांची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ मिळणेसाठी संस्थेने मागणी केली होती. त्या अनुषंगाने संस्थेने मा.न्यायालयात दि.दा.क्र.८३/२०१३ दावा दाखल केलेला आहे. तसेच सदरील हॉलचा ताबा मनपाने घेतलेला आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने प्रलंबित आहे. तसेच दिनांक ५/७/२०१५ रोजीच्या स्थानिक दैनिक वर्तमानपत्रांमध्ये जाहीर प्रगटन देऊन अर्ज मागविण्यात आलेले आहेत. |

**प्रश्न क्रमांक ३३:-**

प्रभाग (क) मधील येणाऱ्या सर्व वार्डातील ड्रेनेजच्या कामांसाठी लागणारी लहान जेटींग मशीनचा उपयोग आता पर्यंत का घेण्यात आलेला नाही याचा खुलासा करणे.

**उत्तर:- वार्ड अभियंता (क), महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रभाग (क) कार्यक्षेत्रातील ड्रेनेज लाईन चोकअपच्या तक्रारी निपटारा करण्यासाठी यांत्रिकी विभागामार्फत पुरवठा करण्यात आलेल्या जेटींग मशिनद्वारे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनचे चोकअप काढण्यात येते.

**उत्तर:- उपअभियंता (यांत्रिकी), महानगरपालिका औरंगाबाद.**

प्रभाग-क अंतर्गत वार्ड मधील ड्रेनेज पाईप चोकअप तक्रारी निपटारा करण्यासाठी सन-२०११ मध्ये ६००० लिटर टँक क्षमतेचे नवीन जेटींग मशीन एम.एच.२०/ए-२९१६ खरेदी करण्यात आले आहे. या जेटींग मशीनद्वारे वार्ड अभियंता यांच्या अधिपत्याखाली ड्रेनेज चोकअप काढण्याचे कामे करण्यात येते. महानगरपालिकेकडे लहान जेटींग मशीन नाही.

**प्रश्न क्रमांक ३४:-**

प्रभाग (क) मधील वेगवेगळया वार्डामध्ये लहान जेटींग मशीनची कमतरता भासते म्हणून प्रभाग (क) ला लहान जेटींग मशीनची व्यवस्था आता पर्यंत का करण्यात आलेली नाही याचा खुलासा करणे.

**उत्तर:- वार्ड अभियंता (क), महानगरपालिका औरंगाबाद.**

यांत्रिकी विभागात प्रत्यक्ष जाऊन लहान आकाराची जेटींग मशिन उपलब्ध आहे काय या बाबत तपास केला असता सध्या उपलब्ध असलेल्या जेटींग मशिन पेक्षा लहान आकाराची जेटींग मशीन यांत्रिकी विभागाकडे उपलब्ध नाही. करीता सध्या उपलब्ध असलेल्या जेटींग द्वारे वार्डातील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईनच्या चोकअप काढण्याचे काम करण्यात येत नाही.

**उत्तर:- उपअभियंता (यांत्रिकी), महानगरपालिका औरंगाबाद.**

वार्ड अभियंता यांच्या कडून लहान जेटींग मशीनची मागणी असल्यास त्या प्रमाणे खरेदीची कार्यवाही करण्यात येईल.

**स.पालिका सदस्य श्री. भादवे रामेश्वर बाबुराव (प्रभाग क्रमांक ५४):-**

**प्रश्न क्रमांक ३५:-**

जाफरगेट अभिनय टॉकीज शेजारी स्टील मार्केटचा Lay out मनपाने कधी मंजुर केला? सदर Lay out व्यावसायीक उद्देशासाठी देण्यात आला की घरगुती? सदर Lay out मध्ये मनपाची खुली जागा नियमानुसार सोडण्यात आली आहे काय? असल्यास ती जागा किती व कोणत्या ठिकाणी? याची माहिती द्यावी.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

न.भू.क्र.१२९६० करीता दिनांक ११.०३.१९८२ ला रेखांकनास मान्यता झालेली आहे.

**प्रश्न क्रमांक ३६:-**

सदर Lay out self Development मध्ये आहे का? की मनपाने डेव्हलप केला आहे? Lay out मंजुर करतांना मनपाने कोणत्या अटी व शर्ती टाकण्यात आल्या आहेत? या बाबतची संपुर्ण माहिती व Lay out मंजुरीची प्रत देण्यात यावी.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद.**

ले-ऑउट मधील अट क्रमांक १० नुसार अर्जदार यांनी अंतर्गत रस्ते, ड्रेनेज इत्यादी विकसीत करणे बाबत नमुद केले आहे.

**प्रश्न क्रमांक ३७ ते ३८:-**

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता), महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ३७ | सन २००५ पासून जाफरगेट आठवडी बाजार कोणकोणत्या ठेकेदारास देण्यात आला? त्यांच्या कडे किती थकबाकी आहे? त्याची वर्षनिहाय माहिती देण्यात यावी तसेच ज्या ठेकेदाराकडे थकबाकी आहे त्यांच्यावर मनपाने काय कार्यवाही केली? याची माहिती द्यावी. | सन २००५-०६ मध्ये श्री.पवन दर्शनलाल जैस्वाल यांना जाफरगेट आठवडी बाजार प्रतिबाजार रु.१५,०००/- प्रमाणे देण्यात आला होता. दिनांक २५/११/२००५ ते ३१/०३/२००६ पर्यंतचा कालावधी थकीत रक्कम नाही.<br>सन २००६-०७ श्री.संजय भरुतु चव्हाण थकीत रक्कम रुपये १,६८,५००/- प्रकरण आर.सी.एच.नं. १२४/२०१२ प्रमाणे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.<br>सन २००७-०८ श्री.कचरु गोकुळ अहीरगवळी थकीत रक्कम रुपये २,६१,०००/-<br>सन २००८-०९ श्री.दीपचंद रेसवाल.आर.सी.एच.नं.९६/२०१२ अन्वये प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.<br>सन २००९-१० श्री.प्रीतम गणेश हटवाल थकीत रक्कम रुपये |

| | | |
|---|---|---|
| | | ७,९२,६६०/- प्रकरण विधीज्ञाकडे पाठविले आहे.<br>सन २०१०-११- } सदरील संचिका ह्या विधी विभागामार्फत<br>सन २०११-१२- } महानगरपालिकेचे विधीज्ञ यांचेकडे न्यायालयीन दाव्यासाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.<br>सन २०१२-१३ श्री.किरण राजु बिडलॉन.<br>सन २०१३-१४ श्री.किरण राजु बिडलॉन.<br>सन २०१४-२०१५ श्री.किरण राजु बिडलॉन. थकीत रक्कम रुपये ८,००,०००/- असुन वसुलीची कार्यवाही प्रस्तावित आहे. |
| ३८ | सध्या जाफरगेट आठवडी बाजार वसुली कोण करते? जाफरगेट आठवडी बाजारात कडबा कटर मशीन किती आहेत? त्यास मनपाची परवानगी आहे काय? त्यांचे कडून मनपास किती उत्पन्न प्राप्त होते? परवानगी नसल्यास मनपाने काय कार्यवाही केली? याबाबतची माहिती द्यावी. | जाफरगेट आठवडी बाजारात एकूण ०७ कडबा कटर मशीन आहेत. त्यांच्या कडून सन १९९८ पासून भाडे वसुली करण्यात आलेली नाही. भाडे वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येईल. |

**<u>प्रश्न क्रमांक ३९:-</u>**

सन २००५ पासुन नगर रचना विभागाकडून किती Lay out मंजुर केले? त्याची संपूर्ण माहिती (गट नं, सर्वे नं, एरिया व मालमत्ता धारक) देण्यात यावी.

सदर Lay out self Development मध्ये काय आहे? त्यात मनपासाठी किती जागा सोडण्यात आली? त्याबाबतची संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**<u>उत्तर:- अप्राप्त.</u>**

**<u>स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरिदास वानखेडे (प्रभाग क्रमांक- ०५):-</u>**

**<u>प्रश्न क्रमांक ४०:-</u>**

**<u>उत्तर:- बीओटी कक्ष प्रमुख,महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | महानगरपालिकेतर्फे ज्योतीनगर मधील CTS NO 16261 मधील 4229.50 sqm. जागा BOT वर शलाका इंजिनियरींग यांना कोणत्या उद्देशासाठी देण्यात आली? सदरील जागेत त्यांना कोणकोणते बांधकाम करण्यास मनपातर्फे परवानगी देण्यात आली? संबंधीतांनी या जागेत कोणकोणते बांधकाम केले? त्यास मनपाची परवानगी आहे काय? नसल्यास मनपाने काय कारवाई केली? सदर ठिकाणी हुक्कम पार्लर, मसाज सेंटर सुरु होते यास मनपाची परवाpनगी होती काय? नसल्यास त्याविरुध्द मनपा काय कारवाई करणार? संबंधितांना पार्कीगसाठी किती | महानगरपालिकेकडून ज्योती नगर येथील न.भू.क्र.१६२६१ या रेखांकनातील खुली जागा येथे पोहण्याचा तलाव बांधणे व सलग्न सुविधा (Amenity) संबंधिच्या सवलती बीओटी तत्वावर विकसीत करणेसाठी प्रकल्पाचे विकसक यांना ९९ वर्षे कालावधीसाठी नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा करुन प्रकल्प विकसक मे. शलाका इंजिनिअर्स ॲन्ड जे.व्ही. यांना पाच वर्षापुर्वीच हस्तांतरीत केला आहे.<br>सदर प्रकल्पाचे जागेत विकासक यांनी अतिक्रमित बांधकामाद्वारे हुक्का पार्लर, पुल टेबल, संगीत क्लास, डान्स क्लास हे गैर व्यवसाय चालवित असल्याचे वृत्तपत्रीय |

| | | |
|---|---|---|
| | जागा देण्यात आली? त्या जागेत सध्या काय आहे? जर सदरील जागेचा उपयोग पार्कींगसाठी होत नसल्यास त्याची जबाबदारी कोणाची? करार पत्रातील अनु क्र.७.१९ नुसार संबंधिताचा करारनामा रद्द करणार का? नसल्यास त्याचे सबळ कारण काय? | बातम्यांमधुन प्रशासनाचे निदर्शनास आले. सदर गैरप्रकारचे कृत्य होत असल्याने आणि विकसक यांनी अनधिकृत बांधकाम करुन त्या जागेत वरील गैरमार्गाने व्यवसाय होत असल्याने सदर बीओटी प्रकल्पास टाळेबंद करण्यात आले.<br>मनपाचे कार्यवाही विरुध्द विकसकाकडून मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे याचिका दाखल करण्यात आली. प्रकरणी मनपाची बाजु मांडणेसाठी विधिज्ञांचा कायदेशीर सल्ला घेऊन मनपाकडून प्रकल्प भाडेपट्टा करारनामा अटी व शर्ती तहत प्रकल्प विकसक यांना नोटीस देण्यात आली.<br>मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे निकालातील आदेशानुसार दिनांक ११.०७.२०१५ रोजी बीओटी प्रकल्पाची टाळेबंदी दुर करण्यात आली. तथापी मा. उच्च न्यायालय यांचे सदर आदेशा प्रमाणे प्रकल्पातील करारनामा शर्तीतहत अनियमितता बाबत महानगरपालिकेने प्रकरणातील कार्यवाही पुढे चालू ठेवणेस आदेशीत केले असल्याने प्रकरण कार्यवाही अधिन आहे. करिता आपणांस माहितीस्तव कळविण्यात येते. |

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद